



RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

रविवार, २३ मार्च २०२५ | वर्ष : ५ | अंक : ८७ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Sunday, 23 March 2025 | Year : 5 | Issue : 87 | Daily | Rate: Rs. 5/-

`` हम देखेंगे
लाजिम है कि हम भी देखेंगे
वो दिन कि जिस का वादा है
जब जुल्म-ओ-सितम के
कोह-ए-गिराँ
रूई की तरह उड जाएँगे
हम महकूमों के पाँव-तले
जब धरती धड-धड धडकेगी ''

**भगत सिंग यांना क्रांतीकारी अभिवादन**




# केंद्र सरकार विरोधात दक्षिण भारतातील 5 मोठी राज्ये एकवटली



**चेन्नई :** सीमांकनाच्या मुद्द्यावरून आतापर्यंत दक्षिण भारतातील राजकीय नेत्यांकडून प्रतिक्रिया उमटत होत्या परंतु आता या मुद्द्यावर आरपारची लढाई होण्याची चिन्हे आहेत. चेन्नई इथे आज या मुद्द्यावर बैठक घेण्यात आली. या 5 राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री सहभागी झाले होते. 3 अन्य राज्यांच्या नेत्यांनीही या बैठकीत भाग घेतला. बैठकीतील सर्व लोकप्रतिनिधींनी सीमांकनामुळे आपापल्या राज्यात होणाऱ्या परिणाम मांडले. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांच्या नेतृत्वात या बैठकीचे आयोजन होते. त्यात केरळचे मुख्यमंत्री पी. विजयन, तेलंगानाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान आणि कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार यांनी भाग घेतला. ओडिशाच्या विरोधी पक्षातील बीजू जनता दल आणि आंध्र प्रदेशातील विरोधी पक्ष वायएसआर काँग्रेस यांच्या प्रतिनिधींनीही बैठकीत सहभाग नोंदवला. सर्वांनी या बैठकीत सीमांकनावर भाष्य केले. सीमांकनाचा अशा राज्यांवर वाईट परिणाम होणार ज्यांनी लोकसंख्या नियंत्रणासाठी कुटुंब नियोजनावर अधिक भर दिला आणि त्यात यश मिळवले. आम्ही सीमांकनाच्या विरोधात नाही परंतु निष्पक्ष सीमांकन झाले पाहिजे. लोकसंख्येच्या आधारावर सीमांकन झाल्यास संसदेत आमचे प्रतिनिधित्व कमी होईल आणि तसे झाले तर केंद्र सरकारकडून निधीसाठी आम्हाला संघर्ष करावा लागेल. शेतकरी अडचणीत येतील. आमची संस्कृती, विकास धोक्यात येईल. आमचे लोक आपल्याच देशात कमकुवत होतील, त्यांचे कुणी ऐकणार नाही असे तामिळनाडूचे सीएम एमके स्टॅलिन यांनी म्हटले. भाजपा कुठलाही विचार न करता हा मुद्दा पुढे रेटत आहे. जर लोकसंख्येवर सीमांकन झाले उत्तरेकडील राज्यांच्या जागा वाढतील. दक्षिणेकडील खासदारांची संख्या कमी होईल. भाजपासाठी हे फायदेशीर होईल कारण उत्तरेकडे त्यांचा चांगला प्रभाव आहे असे केरळचे मुख्यमंत्री पी विजयन यांनी सांगितले. तर सीमांकनाच्या माध्यमातून भाजपा दक्षिणेकडील राज्यांवर दंड लावू इच्छिते. आम्ही सर्वांचा सन्मान करतो परंतु लोकसंख्येवर सीमांकन आम्ही स्वीकारणार नाही असा इशारा तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी दिला.

मागील 5 दशकापासून देशात सीमांकन झाले नाही. 2026 नंतर सीमांकन होण्याची शक्यता आहे. लोकसंख्येच्या आधारे सीमांकन होऊन लोकसभा जागा निश्चित होणार. म्हणजे ज्या राज्याची लोकसंख्या अधिक तिथे जास्त जागा, जिथे कमी लोकसंख्या तिथल्या जागा कमी होणार. 2011 साली लोकसंख्या आकडेवारी पाहिली तर उत्तर भारतातील राज्यात लोकसंख्येत मोठी वाढ झाली आहे. दक्षिण भारतात लोकसंख्या नियंत्रणात आहे. त्यामुळे उत्तर भारतात यूपी, बिहार, राजस्थान, मध्य प्रदेशसारख्या राज्यात लोकसभा जागा वाढतील तर दक्षिण भारतातील तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, तेलंगाणासारख्या राज्यात जागा कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळेच दक्षिण भारतातील राज्य या मुद्द्यावर केंद्र सरकारविरोधात आलेत.

## आमची ओळख धोक्यात येईल..; स्टॅलिन, विजयन, रेवंत आणि पटनायक यांचा सीमांकनाला विरोध

“ लोकसभा जागांच्या प्रस्तावित सीमांकनाबाबत राजकीय गदारोळ सुरू आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि द्रविड मुन्नेत्र कळघम (डीएमके) अध्यक्ष एम. स्टॅलिन यांच्या अध्यक्षतेखाली सीमांकनाबाबत संयुक्त कृती समितीची (JAC) पहिली बैठक शनिवारी चेन्नईत झाली. स्टॅलिन म्हणाले की, मी केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि पंजाबच्या नेत्यांचे स्वागत करतो. आम्ही सीमांकनाच्या विरोधात नाही, पण आम्हसा निष्पक्ष सीमांकन हवे आहे.

“ स्टॅलिन पुढे म्हणाले की, ज्या राज्यांनी कुटुंब नियोजना योजना यशस्वीपणे राबवली आहे, त्या राज्यांवर सीमांकनाचा परिणाम होईल, त्यामुळे आम्ही या योजनेला विरोध करत आहोत. दोन वर्षांपासून मणिपूर जळत आहे, पण त्यांचा आवाज ऐकू येत नाही. कारण त्यांचे म्हणणे ऐकण्यासाठी त्यांच्याकडे खासदार नाहीत. प्रतिनिधित्व गमावून आपण पैसा आणि कायद्यांवरील अधिकार गमावू. विद्यार्थी, महिला, शेतकरी यांना याचा फटका बसणार आहे. या सीमांकनामुळे आपली ओळख धोक्यात येईल, आम्हाला आमच्याच देशात राजकीय अधिकार मिळणार नाहीत.

“ चेन्नईतील परिसीमन बैठकीबाबत ओडिशाचे माजी मुख्यमंत्री नवीन पटनायक म्हणाले, लोकशाहीच्या रक्षणासाठी ही महत्त्वाची बैठक आहे. जर दक्षिणेकडील राज्यांनी लोकसंख्येवर नियंत्रण ठेवले नसते, तर देशावर गंभीर संकट आले असते. जनगणनेच्या आधारे सीमांकन लागू केले जाऊ नये. मीटिंग आयोजित केल्याबद्दल मी सीएम स्टॅलिन यांचे आभार मानतो.

“ केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन म्हणाले, लोकसभेच्या जागांचे परिसीमन डॅमोकल्सच्या तलवारीप्रमाणे लटकत आहे. भाजप सरकार कोणताही सल्ला न घेता या मुद्द्यावर पुढे जात असल्याचा आरोप त्यांनी केला. हे पाऊल अचानक उचलले गेले आहे, जे संवैधानिक तत्त्वे किंवा लोकशाही अनिवार्यतेने प्रेरित नाही, तर संकुचित राजकीय हितसंबंधांनी प्रेरित आहे. जनगणनेनंतर सीमांकन केले तर उत्तरेकडील राज्यांच्या जागांमध्ये वाढ होईल, तर दक्षिणेकडील राज्यांमध्ये ही संख्या कमी होईल, असा आरोप त्यांनी केला.

“ तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी म्हणाले की, दक्षिण लोकसंख्येवर आधारित सीमांकन स्वीकारणार नाही. लोकसंख्येवर आधारित सीमांकनाच्या बाबतीत, उत्तरेकडील राज्ये आम्हाला दुय्यम श्रेणीचे नागरिक बनवतील. आज देशासमोर मोठे आव्हान आहे. भाजप लोकसंख्या दंडाचे धोरण राबवत आहे. आपण एकच देश आहोत. आम्ही याचा आदर करतो, परंतु आम्ही हे प्रस्तावित सीमांकन स्वीकारू शकत नाही. ते आम्हाला राजकीयदृष्ट्या मर्यादित करेल. यामुळे आम्हाला परफॉर्मिंग स्टेट म्हणून शिक्षा होईल. भाजपला कोणत्याही अन्यायकारक परिसीमन लागू करण्यापासून रोखले पाहिजे, असेही ते यावेळी म्हणाले.

“ कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार म्हणाले की, आम्ही आमच्या देशाला कोणत्याही किंमतीत निराश करू इच्छित नाही. पण, आम्ही आमच्या जागाही कमी करून घेऊ शकत नाही. त्यांनी दावा केला की दक्षिण भारताने नेहमीच जनगणनेचे नियम आणि कुटुंब नियोजन धोरणे पाळली आहेत, ज्यामुळे हा एक प्रगतीशील प्रदेश बनला आहे. आम्ही आर्थिकदृष्ट्या आणि साक्षरतेच्या बाबतीत नेहमीच पुढे गेलो आहोत. आम्ही नेहमीच राष्ट्रहिताचे रक्षण केले आहे.

## ‘इलेक्ट्रॉनिक मॉनिटरिंग’मुळे गोपनीयतेच्या अधिकारावर गदा!




**नागपूर :** एखाद्या कैद्याला थेट तुरुंगात बंदिस्त न करता तंत्रज्ञानाचा वापर करून त्याच्यावर पाळत ठेवण्यासाठी ‘इलेक्ट्रॉनिक मॉनिटरिंग’ची तरतूद प्रभावी ठरू शकते. मात्र यामुळे व्यक्तीच्या गोपनीयतेच्या अधिकारावर गदा येण्याची शक्यता आहे. त्यात अतिशय सावधपूर्वक सुरक्षा उपायांसह पथदर्शी प्रकल्प राबवण्याची सूचना सर्वोच्च न्यायालयाने केली. तसेच हे करताना संभाव्य धोक्यांबाबत काळजी घेण्यासही सांगितले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या ‘संशोधन आणि नियोजन’ विभागाद्वारे अलीकडेच एक अहवाल प्रकाशित करण्यात आला. ‘राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरो’च्या (एनसीआरबी) आकडेवारीनुसार भारतातील कारागृहांमध्ये सरासरी भोगवटा दर 131.4 टक्के झाला आहे. जगभरात कारागृहांवरील अतिरिक्त भार कमी करण्यासाठी ‘इलेक्ट्रॉनिक मॉनिटरिंग’ हे तंत्र वापरले जाते. कैद्यांना कारागृहात बंदिस्त करण्याच्या खर्चापेक्षा त्यांचे ट्रॅकिंग कमी खर्चिक आहे, असे या अहवालात नमूद आहे. ओडिशा शासनाने दिलेल्या माहितीनुसार, एका कैद्याला कारागृहात बंदिस्त ठेवायला दरवर्षी सुमारे एक लाख रुपये खर्च येतो. या तुलनेत ट्रॅकिंगचा खर्च केवळ 10 ते 15 हजार आहे. ‘इलेक्ट्रॉनिक मॉनिटरिंग’ हे प्रभावी असले तरी याची अंमलबजावणी काळजीपूर्वक करण्याची आवश्यकता आहे. भारतात याचे परिणाम जाणून घेण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर ‘पॅरोल’ किंवा ‘फर्लो’वर सुटणाऱ्या व चांगली वर्तणूक असणाऱ्या कैद्यांसाठी करण्यात यावा. या पथदर्शी प्रकल्पाच्या यशावर तंत्रज्ञानाचे पुढील भवितव्य ठरवावे, अशी सूचना या अहवालात करण्यात आली आहे. मार्गदर्शक तत्त्वांचा अभाव

* गृह विभागाने आदर्श तुरुंग आणि सुधारात्मक सेवा कायदा, 2023 मध्ये ‘इलेक्ट्रॉनिक मॉनिटरिंग’ची तरतूद केली आहे. मात्र सुरक्षा उपाय आणि मार्गदर्शक तत्त्वे अद्याप तयार करण्यात आली नाहीत. मार्गदर्शक तत्त्वांच्या अभावामुळे अंमलबजावणी करताना कैद्यांच्या मूलभूत हक्कांचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी शक्यता सर्वोच्च न्यायालयाने अहवालात वर्तवली आहे.

* ‘लॉ कमिशन’च्या एका दुसऱ्या अहवालातही संबंधित तंत्रज्ञान केवळ अतिगंभीर गुन्ह्यांच्या प्रकरणात आणि वारंवार गुन्हे करणाऱ्यांसाठी वापरण्यात यावे, असे सांगण्यात आले. सप्टेंबर 2023 मध्ये संसदीय स्थायी समितीने या तंत्रज्ञानाच्या वापराचा पुरस्कार करताना तंत्रज्ञानाचा वापर ऐच्छिक आणि मानवी हक्कांचा उल्लंघन करणारा नसावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## नागपूर दंगलीत 105 आरोपींना अटक



**नागपूर :** नागपुरातील दंगल प्रकरणातील अटक झालेल्या आरोपींची संख्या आता 105 वर पोहचली आहे. त्यात दहा अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. तर पोलिसांनी सोशल मीडिया अकाउंट्सच्या चौकशीदरम्यान मायनॉरिटी डेमोक्रॅटिक पार्टीचा (एमडीपी) कार्यकारी अध्यक्ष हमीद इंजिनिअर आणि यूट्यूबर मोहम्मद शहजाद खान यांना अटक केली आहे. चौकशीत हिंसाचाराचे नियोजन सकाळीच झाल्याचे सोशल मीडिया अकाउंट्सच्या चौकशीदरम्यान पुढे आल्यावर ही कारवाई झाली. शहर पोलिसांकडून दंगलीत सहभागी असलेल्या व्यक्तींची ओळख पटवून त्यांना अटक करण्यावर आता पूर्ण लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. सुरवातीला आरोपीचा शोध घेण्यावर मर्यादा असल्या तरी आता पोलिसांनी गुप्तचर यंत्रणेच्या मदतीने आरोपींचा शोध घेण्याला गती दिली आहे. दरम्यान शुक्रवारी संध्याकाळी, पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल यांनी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. त्यात डॉ. सिंगल यांनी शहरातील शांतता पूनस्थापीत करण्यावर भर दिला. बैठकीत पोलीस संबंधित भागातील परीस्थितीवर लक्ष ठेऊन असून संचारबंदीबाबत शनिवारी पुन्हा विचार होण्याचे संकेतही बैठकीत दिले गेले. महालमध्ये झालेल्या हिंसाचारामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्राथमिक मुल्यांकणात दंगलीत 61 वाहनांचे नुकसान झाल्याचे पुढे आले. महालच्या हंसापुरीमध्ये 17 मार्च रोजी हिंसाचाराची घटना घडली. हिंसाचार पसरवण्यात सोशल मीडिया महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचेही पोलिसांना आढळून आले. तेव्हापासून पोलिस उपायुक्त लोहित मतानी यांच्या मार्गदर्शनाखाली, सायबर पोलिस सोशल मीडिया अकाउंटची चौकशी करत आहेत. या दिशेने पोलिसांना अनेक धक्कादायक माहिती मिळाली आहे. या दिशेने हमीद आणि शहजाद यांना अटक करण्यात आली आहे.

## तिरुपती मंदिरात फक्त हिंदूंनीच काम करावे : चंद्राबाबू नायडू



**तिरुपती :** आंध्र प्रदेशातील तिरुमला तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसादाच्या लाडूंबाबत काही दिवसांपूर्वी मोठी चर्चा रंगली होती, त्यावरून चांगलेच राजकारण तापल्याचे पाहायला मिळाले. त्यातच काही दिवसांपूर्वी तिरुमला तिरुपती देवस्थान मंदिर समितीने मंदिरात कार्यरत असलेल्या पण हिंदू नसलेल्या कर्मचाऱ्यांसाठी एक ठराव मंजूर केला होता, या ठरावानुसार मंदिरात काम करणाऱ्या 18 कर्मचाऱ्यांना हटवण्यात आले होते, अशी माहिती समोर आली होती. तिरुमला तिरुपती देवस्थान मंदिर समितीच्या या ठरावाबाबत मोठी चर्चा रंगली होती. यानंतर आता आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी तिरुमला तिरुपती बालाजी मंदिराबाबत एक मोठे विधान केले आहे. ‘तिरुपती मंदिरात फक्त हिंदूंनाच काम द्यावे आणि इतर धर्माच्या कर्मचाऱ्यांची बदली करावी’, असे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानानंतर आता पुन्हा राजकारण तापण्याची शक्यता आहे.

## न्या. यशवंत वर्मांच्या चौकशीसाठी अंतर्गत समिती स्थापन करण्याची मागणी

**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्यावरील आरोपांची सखोल चौकशी सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने करावी आणि अशा प्रकारच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी अंतर्गत समिती स्थापन करण्याची परवानगी देणाऱ्या तरतुदींबद्दल माहिती द्यावी, अशी मागणी सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ वकील आदिश अग्रवाल यांनी केली आहे. भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या नेतृत्वाखालील सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमची गुरुवारी संध्याकाळी बैठक झाली. या बैठकीत दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांना अलाहाबाद उच्च न्यायालयात परत पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान न्यायाधीश वर्मा यांच्या निवासस्थानी लागलेल्या आगीनंतर तेथे मोठ्या प्रमाणात रोख रक्कम आढळली होती. त्यानंतर वर्मा यांच्यावर गंभीर आरोप झाले होते. यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने वर्मा यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्याचा निर्णय घेतला.

## पुढे असे कोणासोबतही घडू नये : इम्रान सानी

**नागपुर :** नागपुरात सोमवारी दोन गटात उसळलेल्या हिंसाचारात इरफान अन्सारी (38, रा. गरीब नवाज नगर) या तरुणाचा मृत्यू झाला आहे. हिंसाचाराच्या दिवशी इरफानला जमावाने मारहाण केल्यानंतर तो गंभीर जखमी झाला होता. त्याच्यावर मेयो रुग्णालयात उपचार सुरू होते. गेल्या दोन दिवसापासून त्याची प्रकृती चिंताजनक होती, त्यानंतर आज त्याचा मृत्यू झाला. इरफानच्या मृत्यूनंतर, ‘पुढे असे कोणासोबतही घडून नये,’ असे मृत तरुणाचा भाऊ इम्रान सानी यांनी म्हटले आहे. नागपूर हिसांचार आणि भावाच्या मृत्यूबाबत बोलताना इरफान अन्सारीचा भाऊ इम्रान सानी म्हणाले की, ‘आम्ही त्याला वाचवण्याचा खूप प्रयत्न केला पण आम्हाला यश आले नाही, डॉक्टरांनी त्याच्यावर चांगले उपचार केले, पण ते त्याला वाचवू शकले नाहीत.’ त्यांनी पुढे सांगितले की, ‘माझा भाऊ इरफान अन्सारी एका ऑटोने इटारसी जंक्शन रेल्वे स्थानकाला निघाला होता. त्यादरम्यान ऑटो चालकाने त्याला सांगितले की, वातावरण चांगले नसल्याने पुढे जाणार नाही. त्यानंतर माझ्या भावाने रेल्वे स्थानकावर चालत जाण्याचा निर्णय घेतला. वाटेत काही अज्ञात लोकांनी त्याच्यावर इतका जोरदार हल्ला केला की तो बेशुद्ध पडला. त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली, पाय फ्रॅक्चर झाला, पाठीला दुखापत झाली. त्याच्यावर जमावाने हल्ला केला. या आरोपींना कठोर शिक्षा देण्यात यावी. भविष्यात, कोणाबरोबरही अशी दुर्दैवी घटना घडू नये. ‘दरम्यान सोमवारी झालेल्या मारहाणीनंतर इरफान अन्सारी या तरुणाचा आज (शनिवारी) सकाळी 11 वाजताच्या सुमारास मृत्यू झाला. इरफानच्या मृत्यूची बातमी समोर येताच मेयो रुग्णालयासमोर मोठी गर्दी जमली होती. त्यामुळे रुग्णालयाबाहेर तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.



## वंचितांना नेतृत्व देण्याचा काँग्रेसचा उत्तर प्रदेशात प्रयत्न



**नवी दिल्ली :** काँग्रेसने 2027 च्या विधानसभा निवडणुकांसाठी जिल्हा आणि शहर काँग्रेस समितीच्या अध्यक्षांची यादी जाहीर केली आहे. ऑल इंडिया काँग्रेस समितीनं याला मंजुरीही दिली आहे.

नवीन नियुक्त्या झाल्यामुळे काँग्रेस दलित, मागासवर्गीय आणि मुस्लिमांचे प्रतिनिधित्व आणखी ताकदीनिशी करू शकते. मात्र या नियुक्त्यांनंतरही उत्तर प्रदेशमधील सामाजिक समीकरणांचे समाधानकारक प्रतिनिधित्व दिसत नाही असे उपेक्षित समाजाला वाटते. काँग्रेसने 75 जिल्ह्यांसाठी शहर आणि जिल्हा अध्यक्षांची नियुक्ती केली आहे. 2027 मध्ये उत्तर प्रदेशमध्ये विधानसभा निवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसला मित्रपक्ष समाजवादी पक्षासोबत जागावाटप करण्यात अडचणी येत आहेत. एकूणच या नियुक्त्यांमध्ये असे दिसून येते की, 50 पदे उच्च जातीच्या नेत्यांना मिळालेली आहेत. त्यामध्ये ब्राह्मणांना सर्वाधिक, अनुसूचित जातींना 18, ओबीसींना 34, मुस्लिमांना 31 व 1 पद अनुसूचित जमातीला मिळालेले आहे. राज्यातील समिती जेव्हा बरखास्त करण्यात आली तेव्हा जिल्हा आणि शहर अध्यक्ष पदावरील नेत्यांना पुन्हा संधी देण्याचे धोरण पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी अवलंबले आहे. वंचित गटांचे प्रतिनिधत्व वाढले असले तरी ते राज्याच्या लोकसंख्येच्या तुलनेत समाधानकारक नाही. त्यामुळे पुरेशा दलित आणि ओबीसी प्रतिनिधींची नियुक्ती न केल्याने नाराजी पसरली आहे, असे वक्तव्य दलित आणि ओबीसी समुदायातील एका नेत्याने केले आहे. हे फेरबदल सामाजिक न्यायाच्या चळवळीशी सुसंगत असून, आमचे नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वात हे निर्णय घेण्यात आले. सामाजिक न्याय चळवळीच्या तत्वांशी सुसंगत असे हे धोरण आहे. समाजातील अगदी तळागाळातल्या वर्गाच्या नेत्यांनाही नेतृत्वाची संधी देण्यात आली आहे, अशी माहिती उत्तर प्रदेश काँग्रेसच्या मीडिया विभागाचे प्रमुख सी. पी. राय यांनी दिली.

## इलॉन मस्कच्या नावाने एका माजी लष्करी अधिकाऱ्याची 72 लाखांची फसवणूक




**नवी दिल्ली :** प्रसिद्ध उद्योजक इलॉन मस्क यांच्या नावाने एका माजी लष्करी अधिकाऱ्याची 72 लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गेल्या सहा महिन्यांच्या कालावधीत इलॉन मस्क यांच्या नावाने ही फसवणूक करण्यात आली आहे. पोलिसांकडे केलेल्या तक्रारीनुसार, भारतीय लष्कराच्या निवृत्त अधिकाऱ्याने सांगितले की, जानेवारी 2024 पासू मस्क एक्स ऑफिशियल आणि ना शर्मन अशा दोन सोशल मीडिया अकाउंट्सने माजी लष्करी अधिकाऱ्याला फॉलो करण्यास सुरुवात केली. यानंतर या माजी लष्करी अधिकाऱ्यामध्ये त्या दोन सोशल मीडिया अकाउंट्सवरून संवाद सुरु झाला. तेव्हा दावा केला की ते एलोन मस्कची आई (‘मेय मस्क) आणि मे मस्कचे व्यवस्थापक अण्णा शर्मन असल्याचे सांगण्यात आले.

## सुनीता विल्यम्स यांना मिळाला फक्त 430 रुपयांचा भत्ता, डोनाल्ड ट्रम्प अवाक



**नवी दिल्ली :** नासाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर हे नऊ महिने अंतराळात अडकले होते. केवळ दहा दिवसांसाठी अंतराळात गेले असताना काही तांत्रिक अडचणींमुळे त्यांना आणखी 278 दिवस आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात अडकून पडावे लागले. त्यानंतर आता दोघेही पृथ्वीवर सुखरूप पोहोचले असून नासाच्या पुनर्वसन केंद्रात ते देखरेखीखाली आहेत. दरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना एका पत्रकार परिषदेत सुनील विल्यम्स आणि विल्मोर यांना मिळणाऱ्या भत्त्याबाबतचा प्रश्न विचारला गेला, त्यावर त्यांनी दिलेले मजेशीर उत्तर आता व्हायरल होत आहे. सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर हे मागच्या वर्षी जून महिन्यात अंतराळात गेले होते. तिथे काही दिवस संशोधन करून त्यांना पुन्हा पृथ्वीवर परतायचे होते. मात्र परतायला 278 दिवसांचा उशीर लागला. दरम्यान डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊस येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत पत्रकारांनी अंतराळवीरांना मिळणाऱ्या ओव्हरटाईम भत्त्याबाबतचा प्रश्न विचारला. यावर डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, मला याबाबत कुणीही काही सांगितलेले नाही. जर भत्ता द्यायचा झाल्यास मी माझ्या खिशातून देण्यास तयार आहे. महत्त्वाचे म्हणजे, नासाच्या धोरणानुसार सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना अंतराळात अधिकचा काळ घालवावा लागला, त्याबद्दल त्यांना वेतन मिळणार नाही आहे. नासाचे अंतराळवीर हे अमेरिकेचे फेडरल कर्मचारी असतात आणि त्यांचे निश्चित वेतन ठरलेले असते. याशिवाय अंतराळवीरांचा प्रवास, खाणे-पिणे आणि राहण्याची व्यवस्था नासाकडून होत असते. जर अतिरिक्त वेळ काम करावे लागले तर त्यांना दैनंदिन भत्ता केवळ 5 डॉलर्स (430 रुपये) इतकाच मिळतो. याप्रमाणे विल्यम्स आणि विल्मोर यांनी अंतराळात घालविलेल्या 286 दिवसांसाठी त्यांना केवळ 1,430 डॉलर्स म्हणजेच 1 लाख 22 हजार 980 रुपये अतिरिक्त मिरणार आहेत.

## चला आपला बहुजन सौरभ बलशाली करू या !

आपल्या बहुजन समाजातील महापुरुषांच्या विचारांवर आपण सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

त्यांच्या जयंती निमित्त आपण वैयक्तीक अथवा मित्रांच्या/ संस्था/संघटनेची शुभेच्छा जाहिरात स्वरूपात देऊन दैनिक बहुजनसौरभला आर्थिक सहकार्य करावे!




वर्तमानपत्रात बातम्या, लेख, कथा, कविता हवे असते तसेच जाहिराती गरजेच्या असतात हे लक्षात घेऊन आपण आपल्या कुटुंबातील सदस्याचे जयंती-स्मृतीदिन, वाढदिवस, सण, उत्सव, व्यवसाय, उत्पादने इत्यादी अनेक बाबतीत आपल्या समाजातील उद्योजक व व्यवसायिक यांनी जाहिरात देऊन किंवा जसे शक्य आहे तसे आर्थिक मदत केली तरच आपण आपलाच मिडीया बलशाली करू शकतो!

मुख्य संपादक, दैनिक बहुजन सौरभ

# बाल संस्कार आणि व्यक्तिमत्व विकास शिबिरांची आवश्यकता

*लहान मुले हाच उद्याचा भारत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, ‘या कोवळ्या कळ्या माजी लपले ज्ञानेश्वर शिवाजी’ ही लहान मुले ओली माती आहे. आपण कुंभार आहोत. कुंभार त्या मातीला कसा आकार देतो हे महत्त्वाचे आहे. तुम्ही त्या मातीचे गाढव बनवाल तर गाढव दिसेल, घोडा बनवायला घेतला तर घोडा दिसेल. म्हणून आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते याबद्दल किती गंभीर विचार करतात त्यावर या मुलांचे आणि देशाचे भवितव्य अवलंबून आहे. लहान वयात काही लोक त्यांचे मनात विष पेरतात. त्या विषाचा परिणाम ही मुले मोठी झाल्यावर जातीयवादी, अंधश्रद्धाळू, व्यसनी, धर्मांध, अज्ञानी बनतात. दंगलखोर होतात. गुन्हेगार होतात.*

सर्व अधोगतीला जातात. त्यासाठी त्या मुलांना विषापासून वाचवावे लागेल. तो उपाय आहे बाल संस्कार आणि व्यक्तिमत्व विकास निवासी शिबिरांचे प्रत्येक तालुक्यात आयोजन करणे. महाराष्ट्रात किमान 300 शिबिरे आयोजित करण्यात आली तर 30,000 मुले घडतील. हे स्वप्न खरे ठरवायचे असेल तर पायलट प्रोजेक्ट म्हणून हे बाल संस्कार आणि व्यक्तिमत्व विकास निवासी शिबिर आयोजित करण्यात येत आहे. कोणत्याही समाजाचा विकास एका दिवशी कधिच होत नसतो. तो उत्क्रांत पद्धतीने होत जातो. तो आपोआप देखील होत नसतो. त्यासाठी समाजाचे प्रबोधन करावे लागते. ते काम समाजातील प्रज्ञावंत, करुणा असलेले सेवाभावी व क्रांतिकारी लोक करीत असतात. जो समाज तुटलेला आहे, गरीब आहे, अन्याय आत्याचारग्रस्त आहे. त्यांचेकडे मात्र कुणाचे लक्ष नसते. आपल्या अस्तित्वासाठीच त्या समाजातील लोकांना काम करावे लागते. त्यामुळे इतर कामात ते वेळ देत नाहीत. फार कमी लोक महाराष्ट्रात बाल संस्कार आणि व्यक्तिमत्व विकास निवासी शिबिर आयोजित करतात पण ते निवासी नसतात. त्याचा प्रभाव पडत नाही.

संत गाडगेबाबा बहुद्देशीय आश्रमाचे वतीने 1996 सालापासून हे आयोजन मी करीत आहे. इतरांनी त्याचे अनुकरण करावे ही माझी अपेक्षा होती. परंतु ती अजून देखील पूर्ण होताना दिसत नाही. पण एक ते स्वप्न नक्की पूर्ण होईल ही मला आशा आहे. त्या उपक्रमाला बुद्ध विहार समन्वय समितीचे सहकार्याने आता अलीकडे हे आयोजन जोडण्यात आले. हे केवळ एका जाती धर्मासाठी नाही. बुद्ध - कबीर - तुकाराम - फुले - शाहू - आंबेडकर - गाडगेबाबा - तुकडोजी महाराज या विचाराचे हे शिबिर आहे. त्यामुळे इथे जाती धर्माचा प्रश्न नाही. त्यामुळे ज्यांना हे विचार मान्य आहेत ते पालक आपल्या 13 ते 16 वर्षे वयोगटातील मुला मुलींना शिबिरात पाठवतात. आम्ही मुलांकडून फी घेत नाही. त्यांचे पालक जेवढे दान देतील तेवढे आम्ही घेतो. बाकी इतर खर्च लोक वर्गणीतून करतो. या शिबिराला महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड या तीन राज्यातील 100 मुले मुली येतात. या उपक्रमाला समाजाने फार महत्त्व दिलेले नाही. त्याचे त्यांना महत्त्व देखील नसते. बाल वयात जे रुजवल्या जाईल ते शेवटपर्यंत टिकून राहते. हे सर्वांनी लक्षात घ्यावे. म्हणून बहुजन समाजाच्या सार्वजनिक हितासाठी बाल संस्कार आणि व्यक्तिमत्व विकास निवासी शिबिर फार आवश्यक आहे. त्याविषयी हा लेख प्रपंच आहे. व्यक्ती व्यक्ती मिळून कुटुंब निर्माण होते. कुटुंब कुटुंब मिळून समाज निर्माण होतो. कुटुंब विकास झाला तर त्याचा परिणाम म्हणून समाज विकास पावतो. व्यकी विकास झाला तर कुटुंब विकास होतो. कुटुंब विकास झाला तर समाज विकास होतो. एकाचा परिणाम दुसऱ्यावर होतो. अनुकरणाने लोक विकसित होत जातात. म्हणून ही प्रक्रिया गतिमान करावी लागते. भारत देश हा जीर्ण रूढी परंपरांनी ग्रासलेला देश आहे. याची कल्पना सर्वानाच आहे. त्यामुळे भारतीय लोक नवीन विचारांचा सुरुवातीला विरोध करतात. त्यांचे प्रबोधन जर बरोबर झाले तर कालांतराने तोच समाज ते नवीन विचार स्वीकार करतो.

**लेखांक १०३**



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

अस्पृश्यता, जातीयता, स्त्री दास्य, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, निरिक्षरता, अस्वच्छता, बेशिस्त, दिशाहीनता या विकृती जेव्हा समाजात किंवा देशात प्रवेश करतात तेव्हा देश कलंकित होतो. आज आपला भारत देश कलंकित झाला आहे. या देशाची समाज व्यवस्था, राजनीती, राज्यकर्ता वर्ग हा शोषण करणारा सवर्ण आणि भांडवलशाही मानणारा वर्ग आहे. म्हणून ओबीसी - आदिवासी - दलित - मुसलमान - ख्रिश्चन - शीख - बौद्ध हा समाज विकसित व्हावा हे सत्ताधारी वर्गाला स्वप्नं देखील पडत नाही. उलट आज परिवर्तनाचे विरुद्ध दिशेने त्याची पावले पडताना दिसतात. तो विचित्र वर्तन करतो. तो संसदेत यज्ञ करतो. पंचाग पाहून त्यांचे मंत्री झालेले महाभाग शपथ विधी करतात. मंत्री आपल्या चेंबर मध्ये प्रथम जाताना बुवांना आणून पूजा विधी करून प्रवेश करतात. देशाचा संरक्षण मंत्री नवीन लढाऊ विमान स्वीकारताना त्याला मिरची लिंबू बांधतो. प्रधानमंत्री जागतिक विज्ञान परिषदेत भाषण करताना निर्लज्जपणे सांगतो की आमचे देशात भगवान शंकराने मुलाला हत्तीचे तोंड बसवण्यासाठी जगात सर्व प्रथम प्लॅस्टिक सर्जरी केली. या विधानावर विदेशातील वैज्ञानिक आपल्या प्रधानमंत्र्यांना हसतात. राजस्थान उच्च न्यायालयाचा न्यायधिश सांगतो की मोराच्या डोळ्यातील अश्रूची थेंब लांडोर गिळून गर्भवती होते. शस्त्रक्रिया करायचे पूर्वी आपल्या भारतातील डॉक्टर उदबत्ती लावून प्रथम देवाची पूजा करतात. बुद्धी प्रामाण्यवाद आणि वैज्ञानिकतेची या देशाने ऐशीतैशी करून टाकली. त्यामुळे हा देश केवळ भोंदू स्त्रिलंपट साधू पैदा करतो. वैज्ञानिक मात्र पैदा करू शकत नाही.

डार्विनचा धडा अभ्यासक्रमातून हा देश काढतो हे या देशाचे दुर्दैव आणि पापकर्म होय. समाज सुधारक फुले, आगरकर, शाहू, पेरियार, आंबेडकर, गांधी आणि नेहरू यांची अलर्जी या देशातील राज्यकर्त्यांना आहे. जातियतेचे उदात्तीकरण हा देश करतो. या देशात अस्पृश्यता अजूनही पाळली जाते. त्यांचेवर आजही अन्याय-अत्याचार होतात. पर्यावरण विषय समाजाला अजूनही कळत नाही. सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर, कार्यालयात लोक कुठेही थुंकून रोगाचा प्रसार करतात. बरेच लोक केळी खाल्ल्यानंतर त्याची साल रस्त्यावर फेकतात. त्यामुळे कितीतरी लोक पाय घसरून पडतात. त्यामुळे अनेकांना शस्त्रक्रिया करण्याची पाळी आली. कुठेही कचरा फेकणे याचे आपल्याला काहीच वाईट वाटत नाही. हा विषय राज्यकर्त्यांना काहीही महत्त्वाचा वाटत नाही. कारण समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा असे त्यांना कधीच वाटत नाही. कारण त्यांना समाजातील बहुसंख्य लोक गुलाम ठेवायचे आहेत. तेव्हाच ते त्यांचे शोषण करू शकतील. या करीता सुधारणावादी चळवळींनी पुढाकार घेतला पाहिजे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही देशद्रोही प्रतिगामी संघटना बाल संस्कार आणि व्यक्तिमत्व विकास शिबिर आयोजित करते आणि मुलांना विषारी बनवते. ती मुले समाज सुधारणेचे कायम स्वरुपी विरोधक होतात. ते अंधश्रद्धा वाढवण्यात पारंगत होतात. धर्मांधतेत पारंगत होतात. देश प्रगत होण्याऐवजी मागास कसा होईल याचा ते प्रयत्न करतात. विज्ञानवाद, बुद्धी प्रामाण्यवाद, समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय, लोकशाही, संविधान संस्कृती, स्त्री पुरुष समता, शिक्षणाचा प्रसार आणि त्याचे महत्त्व, श्रम प्रतिष्ठा, सदाचारी जीवन, नेतृत्व क्षमता, कला, साहित्य, खेळ, मैत्रीभाव, देशप्रेम या बाबी समाजात रुजवल्या जाण्याची नितांत गरज आहे. परंतु ज्यांना आवश्यकता आहे त्या ओ. बी.सी., आदिवासी, दलित, मुसलमान, ख्रिश्चन, शीख, बौद्ध समाजाला याचे फार महत्त्व वाटत नाही. हे मनाला यातनादायक आहे. ती जागृती करण्याची गरज आहे. मी 1994 साली संत गाडगेबाबा बहुजन विकास आश्रम ही संस्था स्थापन केली. 2013 साली तिचे नाव संत गाडगे बाबा बहुद्देशीय आश्रम असे केले. त्या मार्फत 1996 पासून बाल संस्कार आणि व्यक्तिमत्व विकास निवासी शिबिर आयोजित करणे सुरू केले. त्यात माझी बायको प्रा. डॉ. प्रमिला चींचखेडे यांचा साथ महत्त्वाचा होता. 13 ते 16 वर्षे या वयोगटातील सर्व समाजाच्या मुलांना फी न आकारता दरसाल शिबिर आयोजित केले जाते. खिंडसी, रामटेक, सावनेर, कोराडी, कळमेश्वर, केलझर, वर्धा, नागपूर, काटोल, गोंडखैरी, मौदा येथे हे शिबिर आयोजित केली गेलीत. त्यात 100 मुले-मुली आणि 50 लोक शिक्षक, स्वयंपाकी, स्वयंसेवक अश्या 150 लोकांचे आठ दिवसीय शिबिरात वास्तव्य राहाते. त्या शिबिरातून अनेक मुले-मुली मोठ्या पदावर गेलीत.



आता एकाच वेळी सलग दोन शिबिर आयोजित करण्यात येतात. 100 मुले बाल संस्कार आणि 50 लोक पालि भाषा प्रशिक्षण घेतात. नाशिकचे आचार्य राजेंद्र भालशंकर सर 10 दिवस पालि भाषा प्रशिक्षण देतात. आता पर्यंत मी आणि माझी बायको दोघे जण शिबिराचे नेतृत्व करीत होतो. मी आता 67 वर्षात प्रवेश केला. वयाच्या मर्यादा लक्षात घेता नवीन नेतृत्व माझ्या जिवंतपणी सक्रिय व्हावे आणि सर्व टीम आम्ही त्याला सहकार्य करावे असे ठरवले. म्हणून आता सतीश गायकवाड आणि त्यांची बायको बबिता गायकवाड या शिक्षक तरुणांकडे हे नेतृत्व दिले. आम्ही नवरा बायको आणि आमचे सर्व सहकारी वर्धा येथील सावित्री मुकुंद नाखले, सुषमा पाखरे, उषा म्हात्रे, जया भगत, नागपूर येथील सुविता विश्वनाथ लोखंडे, वनिता कराडे, हरीकिसनदादा हटवार, प्रमोद खोब्रागडे, शिशुपाल रामटेके, भीमराव महेशकर, भीमराव वासे, प्रेमकुमार मानवटकर, विशाल हाडके, सचिन, मिलिंद चहांदे, बाली मानवटकर, भारती हिरेखन, हर्षल हिरेखन, महेंद्र कराडे, हर्षद कुराडे, मृणाली दहीवडे, प्रमिला सोनवणे, अमरावती येथील वैशाली धुरंधर, कर्जत येथील स्मितताई खैरनार, खारघर जिल्हा रायगड येथील मेहराताई गायकवाड ही टीम या आयोजनात निवासी राहून सक्रिय भूमिका पार पाडतात. यापैकी बहुतेक शिक्षक आहेत. हे अतुलनीय कार्य त्यांचेकडून घडते याचा मला सार्थ अभिमान आहे. आम्ही सर्व सतीश गायकवाड आणि बबिता गायकवाड यांच्या नेतृत्वात काम करतो याचा आम्हा सर्व सिनियर लोकांना अभिमान आहे. या उपक्रमाला 1996 पासून लोक वर्गणी गोळा करून यशस्वी केल्या जाते. मुलांचे पालक आपल्या क्षमते आणि इच्छेनुसार दान देतात. तेवढ्यावर शिबिराचा खर्च भागत नाही. पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम, डॉ. एन. डी. पाटील, डॉ. सुहास कानफाडे, डॉ. बी. एस. गेडाम, रेव्हरंट नितीनदादा सरदार, सरदार जगजीत सिंग, प्रा. बी. के. खातरकर, चौकीवर मॅडम, महेंद्र बारसागडे (बुद्धरत्न), प्रभाकर धुरंधर, प्रशांत जारोंडे, एन. व्ही. बहादुरे, अशोक बोंदाडे, सुधाकर दुबे, कुलदीप रामटेके, संजय राहाटे, तारा गजभिये, स्नेहलता चौकीवर हे प्रामुख्याने नियमित सहकार्य करतात. अन्य दान दाते देखील दान देतात. त्यावर हे शिबिर संपन्न होते. यावेळी जुने शिबिरार्थी मदतीला येतील अशी अपेक्षा आहे. त्यांनी शिबिराच्या आयोजनाची जबाबदारी घ्यावी. तरच ते कायम सुरू राहील आणि जुने शिबिरार्थी मोठे झाल्यावर आयोजकांची भूमिका पार पाडतील तर हा उपक्रम चालू राहण्यात अडचण येणार नाही. या सारखे शिबिर इतर ठिकाणी घेणारे लोक यातील माजी शिबिरार्थी व्हावेत ही अपेक्षा आहे. या शिबिरातून निघणारा प्रत्येक शिबिरार्थी विज्ञानवादी, बुद्धी प्रामाण्यवादी, निर्व्यसनी, देशभक्त, संविधानवादी, लोकशाहीवादी असेल. बुद्ध, येशू, पैगंबर, महावीर, गांधी, आंबेडकर, शाहू, फुले, पेरियार, कबीर, तुकाराम, गाडगेबाबा, तुकडोजी महाराज आणि सर्व शास्त्रज्ञ व समाज सुधारक, मानवतावादी आणि क्रांतिकारी लोक त्यांचे आदर्श असतील. कुणाचा तिरस्कार न करता मैत्री, प्रेम, बंधुता बाळगावी, लोभा ऐवजी त्याग भावना वाढवावी, अज्ञानी न राहता अभ्यास करावा आणि ज्ञानी व्हावे. कलेच्या क्षेत्रात मोठे कलावंत व्हावे. मोठे उद्योजक व्हावे. मोठे समाज सुधारक व्हावे आणि चांगली माणसे व्हावीत. यातून चांगली नवी पिढी तयार होईल. याकरीता त्यांना व्यायाम, शिस्त, व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्व विकास, आरोग्य, विज्ञान, खेळ, विविध कला, देशभक्ती, चरित्र, गीत, नाट्य पर्यावरण, लोकशाही, संविधान मूल्य, एकात्मता, सदाचार, आई - वडील - शिक्षक - समाज सेवक - क्रांतिकारक यांचे महत्त्व शिकविल्या जाते. तो जबाबदार आणि सदाचारी देशभक्त नागरिक व्हावा अशी आयोजकांची अपेक्षा असते. यावर्षी नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वस्तूंचे संग्रहालय असलेले शांती वन चिंचोली (फेटरी) नागपूर या पवित्र ठिकाणी 1 ते 10 जून हे दोन्ही शिबिर एकाच वेळी आयोजित केले आहेत. बाल संस्कार शिबिर 8 जूनला आणि पालि भाषा प्रशिक्षण शिबिर 10 जून रोजी समाप्त होईल. असे शिबिर महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यात व्हावेत असा आमचा प्रयत्न आहे. म्हणून जी. बी. पवार, डॉ. सुरेश बिन्हाडे, प्रा. विलास चव्हाण यांचे सहकार्याने धूळे येथे घेऊ. टेक्सास गायकवाड, राहुल खांडेकर यांच्या सहकार्याने देहू पुणे येथे, प्रा. सुनील वाकेकर, प्रा. भारत शिरसाट, किशोर सरोदे यांचे सहकार्याने संभाजी नगर (औरंगाबाद) येथे होईल. तरुण शिक्षक जोडप्यांनी यासाठी सहकार्य करावे. दान दात्यानी सढळ हाताने मदत करावी. डॉक्टर व्हिजिट फार महत्त्वाची असते. तज्ञ मार्गदर्शक ज्यांना मुलांची भाषा कळते अशांनी सहकार्य करावे. यातून समाजात आणि देशात फुले आंबेडकरवादी नेतृत्व निर्माण होईल. सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक परिवर्तनासाठी हे आवश्यक आहे. ज्या गोष्टींची समाजाला गरज वाटते तो पर्यंत ते सहकार्य करतात. नाही तर सहकार्य करीत नाही. याची मला जाणीव आहे. यावर्षी या शिबिरात परप्रांतातून मुले आणि पालि प्रशिक्षणार्थी येतील. ते राष्ट्रीय पातळीचे शिबिर व्हावे. पालकांनी आतापासून मुलांची नावे द्यावीत. 8530980741 हा माझा आणि सतीश गायकवाड यांचा 9970083437 मोबाईल क्रमांक आहे. त्यावर संपर्क करावा. वेळेवर कुणालाही प्रवेश मिळणार नाही. म्हणून सामाजिक कार्यकर्ते, धम्म प्रचारक यांनी समाजापर्यंत हा संदेश न्यावा. मुलांना याचा लाभ व्हावा अशी भावना सर्वांनी करावी. ■ ■

# सत्यशोधकी इतिहासकार प्रा. मा.म. देशमुख

त्यांच्या बोलण्यातून आजचे देशातील द्वेशपूर्ण वातावरण त्यांना अस्वस्थ करत असल्याचे त्यांच्या देहबोलीवरून जाणवले. प्रा. अर्जुन जाधव यांना त्यांनी अनेक वर्षानंतर देखील ओळखले. याचे आश्चर्य वाटले.

मा. म. उर्फ मारोती महादेव देशमुख सरांचा जन्म 11 जुलै 1936 रोजी महादेवराव आणि सखुबाई या भूमिपूत्र दांपत्याच्या पोटी इसापूर येथे झाला. अत्यंत बिकट परिस्थितीतून त्यांनी स्वतःच्या बळावर शिक्षणाचा हिमालय पार केला. सुरुवातीच्या प्री. युनिव्हर्सिटी परीक्षा त्यांनी गुणवत्तेने दफधपास केली. इतिहास हा विषय आवडीचा असल्याने त्यांनी एम.ए. पदव्यूत्तर पदवी इतिहास हा विषय उपलब्ध संदर्भ व पुराव्याच्या आधारेघेवून त्यात घवघवीत यश प्राप्त केले. इतिहासाची तर्क निष्ठता तपासूनच इतिहासाची ते मांडणी करत असत. त्यांनी काही दिवस उपजिवीकेचे साधन म्हणून नागपूर महानगरपालिका प्राथमिक शाळेत प्राथमिक शिक्षक म्हणून कार्य केले होते. पण, ते स्वस्थ न बसता यशाची एक-एक पायरी चढत गेले. त्यानंतर जनता कला वाणिज्य महाविद्यालय मलकापूर येथे प्राध्यापक म्हणून कार्य केले. त्यांचा स्वभाव हरहुन्नरी असल्यामुळे त्यांना नागपुरातील नामांकित धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर येथे इतिहास विषयाचे प्राध्यापक म्हणून संधी चालून आली. ते 1964 ला धनवटे नॅशनल महाविद्यालयात रुजू झाले. याठिकाणी 32 वर्षाची नियमित सेवा करून ते 1 ऑगस्ट 1996 ला सेवानिवृत्त झाले.त्यांच्या कार्यकाळात अनेक विद्यार्थ्यांनी सरांकडून खरा इतिहास जाणून घेतला. बहुजन समाज इतिहासविषयी अनभिज्ञ होता. त्यामुळे त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचेसह सर्व बहुजन महापुरुषांचा खरा सत्यशोधकी इतिहास बहुजन समाजासमोर मांडण्यासाठी वर्तमानपत्रे, मासिकातील लेख, विविध कार्यक्रमातील व्याख्याने, भाषणांद्वारे सामाजिक प्रबोधनाची धुरा सांभाळली. महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कांशीरामजी, जेधे-जवळकर यांचा सत्यशोधकी वारसा प्रखरपणे पुढे चालविला. हे कार्य करत असतांना विरोधाची तमा न बाळगता प्रसंगी शिव्यांची लाखोली सहन केली. विषमतावादी प्रवृत्तींनी त्यांच्या ग्रंथाची होळी केली. पण, ते आपल्या विचारावर ठाम राहिले. जिवंतपणी त्यांची प्रेतयात्रा देखील काढण्यात आली. मध्ययुगीन भारताचा इतिहास या ग्रंथाविरूद्ध न्यायालयीन खटल्याला त्यांना सामोरे जावे लागले. या खटल्यामध्ये जेष्ठ विधिज्ज्ञ व सुप्रीम कोर्टाचे माजी न्यायमूर्ती दिवंगत पी. बी. सावंत यांनी त्यांना या प्रकरणात मार्गदर्शन केले. या न्यायालयीन लढाईत ते जिंकले व बहुजनवादी इतिहासकार म्हणून त्यांना मान्यता मिळाली. त्यांनी मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व सर्व बहुजन संघटनांना परिवर्तनवादी विचारांवर आधारित मार्गदर्शन केल्यामुळेच समतावादी विचारांची पेरणी होवून त्याचे फळ आज बहुजन विचारकांची फळी निर्माण होण्यात झाले आहे. सरांचे नावावर विपुल ग्रंथसंपदा आहे. त्यामध्ये प्रामुख्याने मध्ययुगीन भारताचा इतिहास, दिल्ली सुलतानशाहीचा इतिहास, मोगल कालीन भारताचा इतिहास, युगप्रवर्तक शिवराय आणि मराठ्यांची शौर्यगाथा, अभिनव अभिरूप लोकसभा नाट्य शिवशाही, सन्मार्ग, राष्ट्रनिर्माते, मनुवाद्यांशी लढा, रामदास आणि पेशवाई, मराठा कुणबी समाजाची दशा आणि दिशा, महात्मा फुले यांचे सामाजिक प्रबोधनाचे प्रयत्न, मराठ्यांचे दासीपुत्र, साहित्यिकांची जबाबदारी, शिवराज्य, समाज प्रबोधन, बहुजन समाज आणि परिवर्तन इत्यादी ग्रंथाचा समावेश आहे.

**आम्ही सरांची प्रकृती प्रकृती बरी नसल्यामुळे त्यांची सदिच्छा भेट घेण्यासाठी मागील 7 नोव्हेंबर 2024 ला त्यांचे निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. आमचे सोबत लातुरचे प्रा. अर्जुन जाधव, डॉ. संजय शेंडे, मित्रवर्य सुधांशु मोहोड, दिलीप कांबळे व इतर मित्र मंडळी होती. यावेळी सरांशी विविध मुद्यांवर साधक-बाधक चर्चा झाली.**

प्रदीप सुमन ग. शेंडे
मो. 9422541945



ते नेहमी म्हणायचे, ‘ज्या घरी आहे पुस्तकाचे कपाट, ते घर होणार नाही सपाट’ अलीकडेच सरांनी एक नवीन पुस्तक प्रकाशित केले असून त्यात त्यांनी बहुजन समाजाला सजग केले आहे. ते म्हणतात, ‘अनेक प्रकारच्या गोष्टी व कृती पसरविण्याचे काम मनुवादी करतात. समाज राष्ट्रीय वृत्तीचा असला तर घटनाविरोधी कृती हाणून पाडतात. भारतातील शाळा कॉलेजमधील अभ्यासक्रम व नेमलेली पुस्तके घटनाद्रोही असल्यामुळे अनेक प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनिअर आणि इतर उच्चपदस्थ भयंकर अंधश्रद्धाळू बनलेले आहेत.’ यावर प्रकाश टाकून अखेरच्या श्वासापर्यंत संघर्ष करीत होते.

खऱ्या अर्थाने आदरणीय प्रा. मा. म. देशमुख हे समाजक्रांतीकारक महात्मा जोतीराव फुले यांचे कृतिशील वारसदार होते. यात वादच नाही. हा परिवर्तनवादी वारसा तेवत ठेवण्यासाठी त्यांच्या सर्व ग्रथांचा प्रचार व प्रसार करून, समस्त बहुजन समाजाला शोषणवादी व्यवस्थेतून बाहेर काढण्यासाठी भारतीयत्वाची संकल्पना रूढ करणे आपले नैतिक कर्तव्य आहे. त्यासाठी जातीभेदाला मूठमाती देण्याची आज खरी गरज आहे. अशा या बहुआयामी सत्यशोधकी इतिहासकाराला भावपूर्ण आदरांजली ! ■ ■

**नुकतेच संकेत प्रकाशन, नागपूर तर्फे ‘कांची’ या विद्या भोरजारे यांच्या कादंबरीचे प्रकाशन झाले आहे. संसाराच्या ताप-व्यापात कादंबरीलेखनाचा विशाल पट सांभाळण्यासाठी द्यावा लागणारा वेळ आणि एकाग्रता स्त्रियांसाठी तशी कठीण गोष्ट. त्यामुळे कादंबरी लेखन करणाऱ्या स्त्रिया तशा कमीच. विद्या भोरजारे त्यातही सामाजिक कार्यकर्ता. आजवर विद्याने जवळपास 80 ठिकाणी व्याख्याने दिली आहेत, आंबेडकरी चळवळीच्या अनेक आंदोलनात तिचा सक्रिय सहभाग असतो. अशातही ती जवळपास सव्वातीनशे पानांची मोठ्ठी कादंबरी लिहिते. यासाठी तिला मनापासून दाद द्यावी वाटते.**

# स्त्रीच्या संघर्षमय जीवनाची कहानी ‘कांची’

‘आशुकमाशुकांच्या भ्रामक गोष्टी’ अशी हेटाळणी झालेला, मुळात पाश्चात्य असलेला, अगदी अलिकडील कादंबरी हा वाङमय प्रकार, त्यांच्या गोष्टी वेल्हाळपणामुळे सर्वाधिक लोकप्रिय आणि वाचकप्रिय ठरला आहे. कारण गोष्टी ऐकणे, गोष्टीत रमणे हा मनुष्याचा स्वभाव आहे. ही गोष्ट जर आपल्यापैकीच कुणा एकाची आहे, असे गोष्ट वाचतांना वाटत गेले तर वाचक त्या गोष्टीत रममाण होतो. पुढे काय पुढे काय या उत्सुकतेने तो वाचत जातो. ही उत्सुकता वाढविण्याचे कसब लेखकाच्या लेखनशैलीत असावे लागते. विद्या भोरजारे यांच्या लेखनशैलीत ते आहे. त्यामुळेच या सुंदर कलाकृतीची निर्मिती झाली आहे.




मानवी सुखदुःखाची अनुभूती ही आत्मनिष्ठ व भावात्मक स्वरूपाची असते. या सुखदुःखाचा प्रत्यय इतरांना घडविण्याच्या उर्मीतून साहित्याची निर्मिती होत असते. मानवी अस्तित्वाचा, अवतीभवतीच्या वास्तवाचा आणि जीवनव्यापाराचा अन्वय साहित्यकृतीतून लावला जातो. प्रख्यात मार्क्सवादी समीक्षक जॉर्ज ल्युकास यांच्या मते, ‘साहित्यातील वास्तव म्हणजे व्यक्तीच्या दैनंदिन जीवनातील वास्तवच नव्हे तर त्या व्यक्तीनिष्ठ अनुभवाच्या तळाशी साऱ्या मानवतेला समान असणारे, मानवाला एकमेकांशी जोडणारे एक अदृश्य वास्तव असते. या तळवास्तवाचा व आंतरिक वास्तवाचा कलात्मक शोध म्हणजे साहित्यिक वास्तव.’ लेखिका विद्या भोरजारे यांच्या या कादंबरीतून जॉर्ज ल्युकासच्या या विधानाचा प्रत्यय येतो. कादंबरीची नायिका कांचीच्या जीवनातील वैयक्तिक संघर्ष आणि समाजवास्तवाचा कलात्मक शोध घेण्याचा लेखिकेचा प्रयत्न यशस्वी झाला आहे. त्यामुळेच ही कादंबरी वाचकांच्या मनाचा वेध घेणारी ठरणार आहे.

फ्लॅशबॅक पद्धतीचे रचनातंत्र जे सर्वसाधारण कादंबऱ्यांमध्ये असते, त्याच रचनातंत्राने या कादंबरीचे कथानक पुढे सरकते. आज कादंबरी लिखाणाच्या क्षेत्रात अनेक प्रयोग होत आहेत. मात्र लेखिकेचा कादंबरी लेखनाचा पहिलाच प्रयत्न असल्यामुळे रूढ फार्मेट स्वीकारून लेखन केले हे योग्यच म्हणता येईल. कांची जी पुढील आयुष्यात समाजसेविका बनली आहे, अनेक अडचणीतल्या महिलांना तिने आधार दिला आहे, आपल्या अनेक व्याख्यानातून समाज प्रबोधन केले आहे, अशी ही नायिका कारने एका व्याख्यानासाठी चालली आहे. या प्रवासाच्या प्रसंगाने कादंबरीचा प्रारंभ होतो. मानवी जीवनाचे प्रवाहित्व प्रवास या संकल्पनेतून प्रतीत होते. लग्न होऊन ती नवऱ्यासोबत दिल्ली जवळच्या खेड्यात राहू लागते. नवऱ्याच्या क्रोधी, संतापी, विक्षिप्त स्वभावामुळे कांचीच्या आयुष्याची फरपट होते. नवऱ्याने वारंवार घरातून हाकलून देणे, माहेरी आधार घेणे, सासरी सासूकडे परक्यासारखे राहणे, मुंबई, नाशिक इत्यादी ठिकाणी नवऱ्याची मारझोड, जाच-जुलुम सहन करत दिवस काढतांना भौतिक स्थित्यंतराबरोबर तिच्या मनाचेही स्थित्यंतर होत राहते. बाह्य आणि अंतर्गत स्थित्यंतराच्या एकत्र गुंफणीने कादंबरीचे कथानक पिळदार झाले आहे.



डॉ सुनंदा बोरकर जुलमे
मो. 8766422475

कांची या बुद्ध-आंबेडकरी तत्त्वज्ञानाने प्रभावित स्त्रीची जीवन कहानी असे एकपदरी कथानक या कादंबरीत आले आहे. कांचनकांती हे आई-वडिलांनी ठेवलेले नाव मागे पडून कांची हे तिचे नाव रूढ होते. सालस, समंजस, देखण्या कांचीचा विवाह सागरशी होतो. आनंदी जीवनाची स्वप्न रंगविणाऱ्या कांचीच्या आयुष्याचे नवऱ्याच्या आतताई स्वभावामुळे धिंडवडे निघते. हे धिंडवडे पाहून वाचक मनही हेलावते. काय दोष होता कांचीचा? का तिच्या आयुष्याचे असे मातेरे झाले? सागरला कांचीचा आकस कशामुळे असतो? हे त्याच्या स्वभावावरून नीट कळत नाही. तो तसे कधी स्पष्ट बोलूनही दाखवत नाही. पण पदोपदी तिचा पाणउतारा मात्र करत राहतो. जरासाही प्रेमाचा ओलावा त्याने कांचीला कधी दिला नाही. बायकोशी असेच कठोरपणे वागायचे असते या त्यांच्यात काठोकाठ भरून असलेल्या पुरुषसत्ताक वृत्तीमुळेच तो तसा वागत असावा. त्याच्या या मानवद्रोही स्वभावामुळे तो कांचीच्या निरलस आयुष्याला आत्महत्येसाठी विहीरीजवळ ओढत नेतो, ही या कादंबरीतील अकल्पितता वाचकाला दिग्मूड करणारी आहे. आणि हे सुद्धा या कादंबरीतले भयंकर सत्य आहे की नवऱ्याचा साथ सुटल्यानंतरच ही नायिका स्वतःच्या आयुष्याला सोनेरी किनार देऊ शकते. असे का? का नवऱ्याच्या सोबतीने तिला मनासारखे जगता येत नाही? समाजात हे असे किती काळ घडत राहणार? अशा अनेक प्रश्नांनी वाचकमन सुन्न होते.

लेखिकेची पहिलीचं कादंबरी असून लिखाणाचे तंत्र बरोबर सांभाळले गेले आहे. प्रारंभ, गुंतागुंत, उकल आणि शेवट या कादंबरीच्या तांत्रिक पद्धतीने लेखिकेने कादंबरीला घाटदार केले आहे. केवळ कांची भोवती फिरणारी कादंबरी कुठलेही दुसरे वळण घेत नाही वा उपकथानक सांगत नाही. सव्वातीनशे पानात केवळ कांचीचाच जीवनपट प्रत्ययकारी पद्धतीने मांडत जाते. कांची या मुख्य पात्राशी संबंधित नेमकी आणि नेटकी पात्र योजना लेखिकेने केली आहे. ही सर्व पात्रं आणि हे सर्व कथानक आपल्या भवतीच घडत आहे अशा सजीव रूपात वाचकाला दिसू लागते. या कादंबरीला प्रख्यात लोकशाहीर, गायक संभाजी भगत यांची नेमकी आणि नेटकी प्रस्तावना लाभली आहे. त्यांनी म्हटल्याप्रमाणे, ‘आपले दुःख, आपले जगणे आपल्यालाच मांडावे लागणार आहे’ ही जाणीव आंबेडकरी स्त्रीविश्वाला देण्याचे काम ही कादंबरी करणार आहे.

कादंबरी - कांची
लेखिका - विद्या भोरजारे.
प्रकाशक - संकेत प्रकाशन नागपूर.
पृष्ठ 328. किंमत - 350 ■ ■

# सिनेगीतकार संगीतकार पार्श्वगायक

कला साहित्य शैक्षणिक सामाजिक कार्यात मला परिचित असणारी अनेक कार्यकर्ते, कलावंत गेल्या पस्तीस वर्षात भेटलीत, त्यांच्याशी ओळख झाली. नात्यापेक्षाही जवळचे बंधुत्वाचे स्नेहसंबंध निर्माण झाले. त्यातील कवी गायक विनोद धोत्रे हे एक नाव. कव्वाली जुगलबंदीत कधी एकमेकांसोबत कधी विरुद्ध पार्टीत आम्ही कार्यक्रम केले. शांत, संयमी, मितभाषी अगदी हसमुख असणारे विनोदजी यांच्याशी वीस बावीस वर्ष चांगली मैत्री आहे. सतत कार्यमग्न, नवनवीन गाणी, कॅसेट, लेखन करणारा हा कलावंत आपला नी जवळचा वाटतो. सात आठ वर्षांपूर्वी ते माझ्या गावी घरी कुठेतरी कार्यक्रम निमित्त जाता जाता येऊनही गेलेत. कधी फोनवर, कधी समक्ष गप्पा होतात. गायन लेखनातील काही किस्से एकमेकास ऐकवतो.

विनायक भागुराम धोत्रे उर्फ विनोद धोत्रे. जन्म दिनांक - 24/6/1971. मुंबई सायन हॉस्पिटल येथे सविता भागूराम धोत्रे या मातेच्या पोटी झाला. राहायला धारावी मुकुंदनगर मध्ये, जन्म ज्या दिवशी झाला. त्याच दिवशी वडील बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये मोटार लोडर म्हणून कामाला लागले. आजी आजोबा गिरणीत कामाला असल्यामुळे धारावीत रूम आजीने जागा घेऊन बांधली. वडील 1 महिन्याचे असताना आजोबाचे निधन झाले. वडील एकटेच, कामाला लागल्यामुळे आजीला गिरणीतून राजीनामा द्यायला वडिलांनी भाग पाडले. परिस्थिती तशी बेताची होती. आई सुद्धा मुंबईची. तसे तिचे माहेर दापोली येथील वणवशी पवार कुटुंबातली. दोन ते तीन वर्षाचा लहान असताना आजीने दापोली तालुक्यातील सुकोंडी या गावी घेऊन गेली. विनोद यांचे सुकोंडी जिल्हा परिषदच्या शाळेत काही एक दोन वर्ष शिकले. नंतर आश्रम शाळा वेरळ या ठिकाणी 5 पर्यंत, पुढे न्यू इंग्लिश स्कूल पालवणी येथे दहावीपर्यंत शिक्षण घेतले. आईचे वडील पालवणी या ठिकाणी राहत असल्यामुळे ते त्यांच्याकडे राहत होते. लहानपणीच कलेची आवड असल्यामुळे पालवणी हायस्कूल येथे प्रत्येक कार्यक्रमात बिनधास्त उभा राहून गायचे. तिथेच कलेला प्रोत्साहन मिळाले. काही बक्षीस मिळाले. आपल्याला सुद्धा एक दिवस असेच चांगला गायक बनायचे आहे. पण गाणे गाण्यासाठी चान्स कोण देणार? कोण कार्यक्रम देणार? असे असताना एका कार्यक्रमामध्ये विनोद गात असताना सुप्रसिद्ध कवी गायक उर्दूचा बादशाह श्रीधर जाधव यांची ओळख झाली. त्यांच्यापाटी कोरस करू लागले. तेंव्हा त्यांचे अनेक दर्ग्यावरती कार्यक्रम व्हायचे. त्यांच्या संग जात असल्यामुळे गाणे कसे गायचे, कार्यक्रमात हे पाहून शिकले. अश्या वेळेला प्रल्हाद शिंदे, नवनीत खरे, वसंत मोरे, जनदास गमरे, नारायण वैराळ, मीनाक्षी थोरात, बि. टी. कदम, मनोहर कदम, गौरीकुमार साळुंखे, कृष्णा शिंदे, राजेश जाधव, विद्यानंद गायकवाड, चंद्रमणी घाडगे, मिलिंद मोहिते, कमलेश जाधव, गंगन मामा, जनार्दन मोहिते मामा, किशोर मोहिते, कुंदन कांबळे, दत्ता खरात अश्या अनेक दिग्गज लोकांच्या ओळखी झाल्या. काही वर्ष प्रल्हाद शिंदे दादांच्या बरोबर कोरस साठी जात असत.

सन 2001ला सहा डिसेंबर येथे भारीपचे प्रवक्ते कवी सतीश कुमार साळुंखे यांच्या स्टेजवर एक दोन गाणी गायली. त्यावेळीस त्यांच्या आवाजावर खुश होऊन सतीश साळुंखे साहेबांनी पहिलाच कार्यक्रम प्रख्यात गायिका मैनाताई कोकाटे यांच्याबरोबर तिकिटावर परेल या ठिकाणी ठेवला. याआधी सामना कधीच केला नव्हता. पहिलाच सामना रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. त्यावेळी कवी गायक नाथा जाधव आणि त्यांचे संपूर्ण गावाले कार्यक्रम पाहायला आले होते. तिथपासून अनेक ठिकाणी मुंबईमध्ये गावच्या ठिकाणी संपूर्ण महाराष्ट्रभर कार्यक्रम मिळू लागले. त्या काळामध्ये अनेक कलावंत कॅसेट काढून सहा डिसेंबरला तीन दिवस विकायचे. हे पाहून



**विनोद धोत्रे**

आपणही कॅसेट काढावी असे वाटू लागले. जाणीव भासत होती पण पैसा कुठून आणायचा? एक कॅसेट बनवायला कमीत कमी त्यावेळेस पन्नास ते साठ हजार रुपये लागायचे. पण आपलेही गाणे रेकॉर्डिंग व्हावे आपले ही गाणे एखादे लोकांपर्यंत पोहोचावे ही फार मोठी आशा होती. नवीन लग्न झाले होते. बायकोला विश्वासात घेऊन गळ्यातले लग्नाचे मंगळसूत्र मोडले. पहिलीच कॅसेट बनवली. ‘जय भीम म्हणतय पोर माझं’ आणि सहा डिसेंबरला ती रिलीज केली. उद्देश एकच होता घरा घरात आपले प्रबोधनात्मक विचार पोहोचवावे. घरची परिस्थिती तेव्हा फारशी चांगली नव्हती. कधी कार्यक्रम मिळायचे, कधी नाही मिळायचे कार्यक्रम पण बिदागी फार कमी असायची. पुढे ठरवले कीं रेकॉर्डिंग क्षेत्रात करियर करायचे, संगीतातले तेवढेच राग रागिणी फारस माहित नव्हते. तरी एका ओळखीच्या माणसानी गाणे लिहायचे आणि म्युजिक द्यायची हे काम दिले. तिथे सचिदानंद अद्यप्पा, गोविंदजी म्हशीळ्कर यांचा पुतण्या यांशी झाली. त्यांनी venus म्युजिक प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत गाणे लिहीण्यासाठी संगीत अरेंजिक या जबाबदाऱ्या दिल्या आणि त्याचे सोने करायचे ठरविले.



राष्ट्रपाल भा. सावंत
मो. 9403144356

व्हीनस, टी सिरीज, टिप्स विंग्स, अश्या अनेक म्युजिक कंपनीसाठी गाणी लिहिण्याचे आणि संगीत देण्याचे काम अजून करीत आहेत. नाशिक या ठिकाणी अमृततुल्य आणि आणि कमल फिल्म प्रोडक्शन यांच्याकडून राज्यस्तरीय कलावंत पुरस्कार नाशिक या ठिकाणी 2023 ला मिळाला. तसेच महाराष्ट्र गौरव पुरस्कार 2024 आणि धम्म दिप सांस्कृतिक कला मंच दापोली या संस्थेच्या तृतीय वर्धापन दिनी कला रत्न पुरस्कार अनेक युट्युब चॅनेलसाठी नामवंत कॅसेट कंपनीसाठी हजारो गाणी लिहिली आहेत. काही गायली आहेत काही म्युजिक दिली आहे. त्यातले तुला खांद्यावर घेईन, कांताबाईची सेल्फी, बसला दिल्लीच्या गादीवर, चंद्राची चांदणी, सोन्याचा बंगला, चल चल पोरी डीजे वर करु या डान्स, भीमाने दावीला गौतम बुद्ध, पोरा तुझ्या प्रेमाने, ठेवलय काळजाच्या खणात, अशी अनेक गाणी हिट आहेत.

माणूस एक माती, जोखड या सारख्या चित्रपटात म्युजिक आणि गिते आणि गायन अजून ही हिंदी मराठी आणि भोजपुरीसुद्धा गाणी लिहितात आणि प्रबोधनाचे कार्यक्रम सुद्धा करीत आहे. आपल्या सर्वांचे रसिकाचा असाच प्रतिसाद मिळाला तर अनेक गाणी लिहायला प्रोत्साहन मिळेल. असे ते मला नेहमीच म्हणतात. त्यांच्या या समाज परिवर्तन प्रबोधन कार्यासाठी पत्नी विद्या आणि चिरंजीव सुमेध, यांचे प्रोत्साहन मिळत असते. त्यांना या कला कार्यासाठी अनेक सन्मान मिळाले आहेत. वामनदादा कर्डक, त्यात महाराष्ट्र गौरव पुरस्कार, दापोली धम्मदीप कला मंच यांचा कलारत्न पुरस्कार, यापुढेही ते मिळावेत हीच मंगल कामना. ■ ■

“ शिक्षणाने माणसाचे जीवन फुलते,
आपण या जगात कशासाठी आलोत हे कळते! ”



# सारे मिळून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करू या!

**भारत सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ही विविध लोककल्याणकारी योजना आरंभ करून साजरी केली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोककल्याणासाठी आपले प्राण अर्पण केले आहे. त्यांच्या जयंतीला देशभरातील जनतेच्या ज्या काही समस्या आहेत त्या सुटल्या पाहिजे आणि लोककल्याणाचे कार्यक्रम जाहीर झाले पाहिजे. नाही तर त्याचा आरंभ झाला पाहिजे. मार्च महिन्यातील आर्थिक बजेट आणि एप्रिलला केलेल्या घोषणांची अंमलबजावणी झाली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र सर्वांना प्रेरणादायक आहे. गाव, वस्ती, आदिवासी पाडा, टोली, बेडा, शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने विविध प्रकारचे कार्यक्रम होतात. ते झाले पाहिजे यासाठी सर्वांचे प्रयत्न असतात.**

14 एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने विविध ठिकाणी बैठका सुरू आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशासाठी आणि लोक कल्याणासाठी काय केले ते सांगताना अनेक तरुण रमून जातात. काय सांगू आणि काय राहून गेले असेच आयोजकांचे झाले असते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे मिळविण्यासाठी मोठी धडपड असते. जयंती होईल ती जोरात होईल हा नव्याने नवा विचार देऊन जाईल. जयंती निमित्ताने आयोजित बैठकीत नवनाथ बोलत होता त्याच्या बोलण्यात दम होता. डॉ. बाबासाहेबांनी या देशातील जीवनमानाचे यथायोग्य मूल्यांकन करून स्वकर्तृत्वाने भारतीय राज्यघटना लिहिली. या घटनेच्या प्रत्येक मसुद्यात प्रत्येक भारतीय नागरिकाला या देशाच्या उज्वल भवितव्यासाठी, हा माझा देश आहे याचा अभिमान वाटावा एवढी स्वयंस्फूर्त शक्ती प्रत्येक नागरिकांच्या हाती दिली आहे. गरीब असो की श्रीमंत असो, त्या सर्वांनी एकाच रांगेत उभे रहायचे, एकाच मतपेटीत आपले अमूल्य मत टाकण्याचा अधिकार बहाल केला. हा देश एक सूत्रात बांधला. देशातील प्रत्येक नागरिकाला स्वतंत्र विचार व्यक्त करण्याचा अधिकार दिला. धर्मस्वातंत्र्याचा अधिकार दिला. संसदेची कार्यपद्धती, वित्तव्यवस्था, व्यापार-उदिम, व्यवहारसंबंध, परराष्ट्र धोरण, संरक्षण धोरण याविषयी कायदे केले. त्यांच्या अर्थशास्त्राच्या विद्वत्तेमुळे आपल्या देशात रिझर्व बँकेची स्थापना झाली. असे सांगताच टाळ्यांचा गजर झाला. कामगारांच्या, कष्टकऱ्यांच्या उन्नतीसाठी समान वेतनाचे कायदे केले. सर्व जाती-धर्माच्या महिलांसाठी हिंदू कोड बिल संसदेत मंजुरीसाठी प्रस्तुत केले. परंतु, त्या वेळच्या राजकर्त्यांनी ते बिल पास होऊ दिले नाही. व्ही. पी. सिंग सरकारने ते बिल पास करून घेतले. त्यामुळे या देशातील सर्व जाती-धर्माच्या स्त्रियांना पुरुषाप्रमाणे, समान वेतन, समान अधिकार मिळाले आहे. बाळंतपणात भरपगारी सुट्टी त्यांना मिळाली. ज्यांच्या मुळे त्या उच्चपदी विराजमान होत आहेत. देशाच्या वाढत्या लोकसंख्येबाबत जागृत होण्यासाठी कुटुंब नियोजनाचे कार्यक्रम राबविण्यासाठी संसदेत प्रस्ताव मांडून पुढील वर्षात आपण कुठे पोहचू याचे अचूक वर्णन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले होते. परंतु तत्कालीन सरकारने डॉ. बाबासाहेबांचे ऐकून न ऐकल्यासारखे केल्यामुळे आज आपल्या देशाची लोकसंख्या दीडशे कोटीच्या पुढे वाढत आहे. डॉ. बाबासाहेबांनी मुलींना






**विलास गजभिये**
मो. 9421588901

हक्काचे आणि सवलतीचे शिक्षण घेण्यासाठी कायदे केले. खेडापाड्यातील मुलींची शिक्षणात उन्नती होण्यासाठी, त्यांच्यासाठी वसतीगृहे काढली, या कायदेपंडीताने कायद्याबरोबर स्त्रियांना प्रबोधन करताना सांगितले की, हाताच्या कोपरापर्यंत बांगड्या तसेच पायात तोडे घालून स्वतःला बंदिस्त करु नका. या देशातील शेतकऱ्यांसाठी डॉ. बाबासाहेबांनी जलसंपदेच्या अनेक योजना संसदेत मांडून त्या मंजूर करुन घेतल्या. त्यांच्या अथक परिश्रमामुळे भाक्रानांगल प्रकल्प कार्यान्वीत झाला. त्याची फलश्रृती म्हणजे संपूर्ण पंजाब राज्यात या धरणाचे पाणी कालव्याव्दारे पसरविलेले आहे. वर्षाचे बाराही महिने पाणी उपलब्ध झाल्यामुळे संपूर्ण पंजाब धनधान्याच्याबाबतीत सुजलाम सुफलाम झालेला आहे. भाक्रानांगल धरणाबरोबर दहा-बारा धरणे काही राज्यात बांधली आणि ती कार्यान्वीत केली. धरणामुळे विद्युत प्रकल्प राबविता आले. महाराष्ट्रातील मराठवाड्याला सुपिक करण्यासाठी उत्तरेकडील प्रलयंकारी नद्याचे पाट काढून महाराष्ट्रात आणण्याचे त्याचे स्वप्न होते. असे नवनाथ म्हणताच सर्व उपस्थित लोकांच्या भुवया उंचावल्य होत्या. डॉ. बाबासाहेबांचा हा निर्णय त्यावेळी अंमलात आणला असता तर आज शेतकऱ्यांना दुष्काळाच्या वाटेवर असाह्य होऊन आत्महत्या कराव्या लागल्या नसत्या. देशात हजारो वर्षे गुलामगिरीच्या खाईत नडलेल्या, गांजलेल्या अस्पृश्यांना कायदे करुन त्यांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. पिण्याचे पाणीसुद्धा ज्यांच्या नशिबी नव्हते, पाणी मागून ओंजळीने प्यावे लागू नये म्हणून त्यांनी पाण्याचा सत्याग्रह करुन त्यांना आपल्याच हाताने पाणी पिण्याचा अधिकार मिळवून दिला. त्यांना गुलामगिरीतून बाहेर काढून ताठ मानेने जगण्याचा आणि अभिमान वाटणारी गोष्ट आहे. आज जगातील सारेच देश डॉ. बाबासाहेबांनी लिहीलेल्या राज्यघटनेच्या गुणवत्तेचे तोंडभरुन कौतुक करीत आहेत. आपल्या राज्यघटनेसंबंधीत तिथे चर्चासत्रे आरंभली जात आहेत. जगातील अनेक ठिकाणी डॉ. बाबासाहेबांचे पुतळे उभारले जात आहेत. यामुळे असे वाटते की, एके दिवशी डॉ. बाबासाहेबांनी लिहीलेली राज्यघटना संपूर्ण जगात स्वीकारली जाईल. नवनाथचा हा आशावाद खूप काही सांगत होता. डॉ. बाबासाहेबांनी लिहिलेल्या घटनेत पहिल्या वाक्यात सर्व जग जिंकण्याची किमया आहे, आकर्षकता आहे, गुणवत्ता आहे, मनाला आनंद देणारा संदेश आहे, प्रभावीपणा आहे, एक आखीव रेखीव मापदंड आहे, सत्य सृष्टीचा अनमोल खजिना आहे. भारतमातेच्या गळ्यातील सुवर्ण अलंकार आहे. आम्ही गावाच्या बाहेर राहणारे त्यांच्यामुळे माणसात आलो आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्येक शब्दात देशाप्रती आणि नागरिकाप्रती आदरभाव व्यक्त करणारी घटना आमच्या उद्धारकर्त्याने अपार कष्ट घेऊन लिहिली आणि हा देश एकत्र आणला. आज आमचे बाबा, संपूर्ण जगाचे साहेब झालेले आहे. म्हणून आम्ही सारे मिळून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करू असे नवनाथ म्हणताच पुन्हा जोरदार टाळ्यांचा गजर झाला. ■ ■

## दोन शब्दांची कविता

संतांची चमकली
शाहिराची झळकली
अर्वाचीन प्राचीन
अभिजात कविता

भाषेवरील हुकूमत
आभासी हिंदकळत
प्रचितीत सामर्थ्याच्या
विभूषित कविता

दृष्टीतली विपुलता
जाणिवेतली विफलता
आशयगर्भित उपहासाने
विद्रोही कविता

समाजाभिमुख वृत्ती
दीनदुबळ्याची कृती
नैराश्याच्या रसायनात
आशावादी कविता

भावस्निग्ध अर्थरम्य
प्रेमभावना तारतम्य
निडर बेफिकीर
स्नेहमय कविता

आर्तता आकाशवेडी
अध्यात्मिक बाराखडी
शारदेच्या स्मरणार्थ
परमानंद कविता

**- शैलजा लोखंडे गोरडे**
7038251196



**काव्यफुले**
संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225
बहुजन सौरभ

## धर्माच्या नावावर दंगल का?

धर्माच्या नावाने रस्ते जळाले,
नेत्यांचे चेहरे मात्र फुलून गेले!
मंदिर-मशिदी झिजल्या पुन्हा,
सामान्य माणसं मरती, हा खेळ
जुना!
कोणी भडकवी, कोणी पेटवी,
हिंसेच्या नादाने सत्ता बहरवी!
दगडफेक होते, रक्त सांडते,
अंधश्रद्धेची मशाल पेटते!
धर्म तुझा, धर्म माझा,
माणुसकी कुठे? शोधतो राजा!
खुर्ची मिळावी म्हणून लढवतात,
गरिबांच्या जीवाशी खेळतात!
उठा जागे व्हा, उघडा डोळे,
नफरतीच्या धगीत नका होऊ
भोळे!

**- प्रज्वल टोंगे**
मो. 8788343531

## कुणी औरंगजेब? घेता का रे औरंगजेब?

त्याच्या कबरीसाठी मोजावे लागणार
महागाई, शिक्षण, आरोग्य, रोजगार
इतक्या स्वस्त दरात मिळेल..
सोबत धर्म
फ्री... फ्री... फ्री

संत परंपरेत...
शिव, फुले, शाहू, आंबेडकर
विचारधारेत..
सुसंस्कृत महाराष्ट्रात....
औरंगजेबाची कबर
महागात की स्वस्तात?

कुणी स्वच्छ हवा घेता का..?
राजकारणाने दूषित केलेल्या
महाराष्ट्रात...
ऑक्सिजन विकतोय...

हा महाराष्ट्र,
स्वच्छ हवेपासून...
निर्मळ संत परंपरेपासून...
पर्यावरण बिघडवून घेत आहे
शब्दाने आग लावून घेत आहे
ही आजची व्हॉटस्अप युनिव्हर्सिटी
मनुष्यजात...!

कुणी शिव, फुले, शाहू, आंबेडकर
एकनाथ नामदेव तुकाराम
देईल....
अशी जागा शोधत आहे...
कायदा सुव्यवस्थेचे तेरा वाजलेला
महाराष्ट्र...

आज अस्मिता जपणारा
समजूतदार नागरिक शोधत आहे...
आहे का कुणी?
कळकळीची विनंती...!

**- शुभम राऊत**

## नोंदी..




मेंदूत पेरते आग
दंगल..
करते घरांची राख..
दंगल..
कोण? का? कशी ?
कुठे ? कुणासाठी ?
कळत नाही पेटवते
दंगल..
मात्र माणसांना आयुष्यातून
उठवते.
दंगल....
विझवते चूल
दंगल..
धर्मांध भूल .
दंगल..
उसवते मैत्रीची वीण
दंगल..
विषारी नागीण.
दंगल...
लागू देत नाही ठाव
दंगल..
देऊन जाते पिढ्यांना घाव.
दंगल..

**- अनिरुद्ध कांबळे**

## अमृतस्पर्श



थेंब पावसाचे करी
धरा तृप्त भेगाळली
अमृतस्पर्शाने शीत
तप्त पृथ्वी गंधाळली
गर्भ मातेच्या उदरी

अमृतस्पर्शाने वाढे
अनुभूती स्पंदनांची
लाली मायमुखी चढे
बाळ अमृतस्पर्शाने
ओळखतो प्रेम राग
माया ममता जागते
स्पर्शाचाच एक भाग
अमृतस्पर्शाने वधू
ओशाळते बाहूपाशी
स्वर्गसुख पतीसंगे
रचे स्वप्नांच्याच राशी
धीर देताच आशेनी

अमृतस्पर्शाने मित्र
देई उमेद जगण्या
बदलते जगी चित्र
रोगी वेदनेत हारे
मृत्यू येईल कवेत
अमृतस्पर्शाने वैद्य
भिती पळवी हवेत
कळी उमलते बंद
भुंगा अमृतस्पर्शाने
निसर्गाचा खेळ न्यारा
जीव गुंततो हर्षाने..

**- डॉ.शील बागडे**

## मनावर संयम असावा !

तीन मनोरंजक लघु कथा. या तीनही कथांना सखोल अर्थ आहे. या कथा वाचून आपल्याला नक्कीच हसायला येईल. तुम्हीही वाचा आणि आवडल्यास पुढे पाठवा.

### 1. 'गहन'



मी लिफ्ट मध्ये एका लहान मुलाला आईस्क्रीम खात असलेले बघितले. त्याची काळजी वाटून मी त्याला सहज बोललो, 'आज खूप थंडी आहे. हे आईस्क्रीम खाऊन तू आजारी पडशील!' तो मुलगा उत्तरला, 'माझी आजी 103 वर्षांपर्यंत जिवंत राहिली.' मी विचारले, 'आइसक्रीम खाल्यामुळे?'
तो म्हणाला, 'नाही, कारण तिने कधीच दुसऱ्याच्या कामामध्ये नाक खूपसले नाही!'
किती खोल अर्थ दडला होता त्या उत्तरात! आता मला समजले की मी इतक्या वेगाने का म्हातारा होत चाललोय - कारण नसताना मी दुसऱ्याच्या कामात केलेली ढवळाढवळ. दुसरे काय?

### 2. 'थकलेला'

आज-काल जिथे तिथे घोटाळेबाज दिसून येतात. मी




नुकताच बातम्यांमध्ये लोकांच्या बँक अकाउंट बद्दल बातम्या पाहात होतो. लोकांच्या खात्यांतून लाखो रुपये बघता बघता नाहीसे झाले होते आणि ते कुठे गेले याचा मागमुसही लागत नव्हता.
ती बातमी पाहून जाम घाबरलेलो मी माझ्या बाईकने बँकेत गेलो. एटीएम मध्ये माझे कार्ड स्वाईप केले, माझा पासवर्ड टाकला आणि माझ्या खात्यातली शिल्लक तपासली. माझ्या खात्यात शिल्लक असलेले साडेसातशे रुपये अजूनही माझ्या खात्यातच पडून होते मी सुटकेचा निःश्वास टाकला.
बापरे, माझ्या मनावरचा ताण आता हलका झाला होता. आता यापुढे पुन्हा कधी बातम्या ऐकणार नाही असे मी मनोमन ठरवून टाकले. नको पुन्हा तो भयंकर तणाव!
मात्र मी एटीएम मधून बाहेर पडलो तेव्हा हे बघून मी मनाने आणखीनच हबकून गेलो हे माझे साडेसातशे रुपये अजूनही तसेच माझ्या खात्यात शिल्लक असले तरी माझी मी नुकतीच पार्क केलेली बाईक मात्र आता जागेवर नव्हती.

### 3. 'थांबा'

एक तरुणी ट्रेनमध्ये चढली आणि आपल्या सीटवर




दुसराच कोणी माणूस बसल्याचे तीने पाहिले. विनम्रतेने आपले तिकीट तपासून बघितले आणि ती म्हणाली, 'सर, मला वाटतेय आपण चुकून माझ्या सीटवर बसला आहात.'
त्या माणसाने आपले तिकीट काढले आणि तिला ते दाखवत तो तिला रागाने ओरडून म्हणाला, 'हे तिकीट जरा नीट बघ. ही माझीच सीट आहे. तू आंधळी आहेस का गं?' त्या तरुणीने बारकाईने ते तिकीट तपासले आणि तिने त्या माणसाशी वाद करणे थांबवले. ती काही न बोलता त्या सीटपाशी उभी राहिली.
ट्रेन सुरू झाल्यावर काही वेळाने ती तरुणी खाली वाकून त्या माणसाला म्हणाली, 'सर, तुम्ही चुकीच्या सीटवर नाही बसलात. परंतु तुम्ही चुकीच्या ट्रेनमध्ये बसला आहात. ही ट्रेन मुंबईला जातेय आणि तुमचे तिकीट आहे अहमदाबादच.'
तात्पर्य, मनावर संयम असावा. आपण बोलण्यापूर्वी किंवा कृती करण्यापूर्वी विचार केला पाहिजे. अन्यथा आपल्याला पश्चात्ताप करावा लागू शकतो. ओरडण्याने जर सगळेच प्रश्न सुटले असते तर कदाचित या जगावर गाढवांनीच राज्य केले असते. ■ ■

संकलन
**- शत्रुघ्न लोणारे**

## आंबेडकरी चळवळीला गतिमान करणारा विशेषांक

आंबेडकरी चळवळीला गतिमान करण्यासाठी नियतकालिकांची मोठी भूमिका राहिलेली आहे. 'सामाजिक प्रबोधन' हेच मुख्य प्रयोजन ठेवून कार्य करीत असल्यामुळे सामाजिक परिवर्तनाला पूरक वातावरण तयार होऊ लागले आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती येथून सुनंदा बोदिले यांनी संपादित आणि प्रकाशित केलेल्या 'मुक्त मंथन' या नियतकालिकाचा 'ऑनोडि-2024-आंबेडकरी चळवळ विशेषांक' विशेष लक्षणीय आहे. यात आंबेडकरी चळवळीचा विविध अंगाने वैचारिक आढावा अनेक लेखक, विचारवंतांनी घेतला आहे. तो निश्चितच अभिनंदनीय आहे. खरेतर कोणत्याही चळवळीचे वेळोवेळी परीक्षण होणे गरजेचे असते, त्यातूनच बरेचदा आत्म परीक्षणही केले जाऊ शकते.
प्रस्तुत विशेषांकात 'आंबेडकरी चळवळीचा आश्वासक हुंकार - आंबेडकर चित्रकला' या लेखात प्रा. प्रसेनजित तेलंग यांनी विविध चित्रकारांच्या कलेचा आढावा घेतला आहे. त्यांनी म्हटल्याप्रमाणे, 'चित्रकलेच्या क्षेत्रात आंबेडकरी विचार दिशादर्शक आहे म्हणून तो एक स्वतंत्र प्रवाह मानल्या जावा, इतपत आंबेडकरी चित्रकारांचे कार्य आता प्रभावी ठरत आहे.' 'कला संस्कृतीचे उपासक डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या लेखात डॉ. अशोक इंगळे म्हणतात, 'गायन व वादन कलेत डॉ. बाबासाहेबांना रुची होती. वाद्य वाजवायला त्यांना फार आवडायचे.' प्रा. युवराज गंगाराम यांनी 'आंबेडकरी राजकीय चळवळी' विषयी भाष्य केले आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार आणि त्यानंतरची शैक्षणिक चळवळ' या विषयावर डॉ. गजानन लोहवे यांनी विचार व्यक्त केले आहे. डॉ. लोहवे यांनी म्हटल्याप्रमाणे, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या एकूणच जीवनाचे सार म्हणजे माणसाला प्राप्त होणारे शिक्षण आणि त्यायोगे त्याला मिळणारे स्वातंत्र्य, त्यांच्यात निर्माण होणारी अस्मिता आणि माणुसकीय जगणे होय.' 'आंबेडकरवादी साहित्याचीच आज सर्वाधिक गरज' या लेखात डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, 'आंबेडकरवादी अशी निरंतर प्रगमनशीलता आहे. मानव उपकारक इष्टांचा आणि माणसांमधील संबंधाच्या सौंदर्याचा नवनव्याने शोध हे त्याचे प्रमाणशास्त्र आहे. 'अनंत पैलूंचे उदंड मानवी कर्तृत्व-डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या लेखात डॉ. युवराज सोनटक्के म्हणतात, 'क्रियाशील व बुद्धिवादी विचारक हा कुणा विशिष्ट व्यक्तीचा न राहता तो समष्टीचा असतो. कारण त्याचे विचार हे मानवी कल्याणाचे व उत्थानाचे असतात. वैचारिक ऊहापोहात सापडलेल्या अनेक अभ्यासकांना त्यातील विविध पैलूंचे गांभीर्य उमगले तर सामाजिक परिवर्तनाचे अथवा क्रांतीचे आंदोलन अधिक सरसतेने उजागर होते.' 'आंबेडकरी साहित्य चळवळ एक मीमांसा' या लेखात डॉ. आशा थोरात म्हणतात, 'आंबेडकरवादामध्ये 'एक व्यक्ती- एक मूल्य' हे तत्त्वज्ञान मान्य करून स्वातंत्र्य, समता, बंधुता म्हणजेच सामाजिक नीतीमत्ता स्वीकारून व्यक्तीचे सर्वांगीण कल्याण साधण्याचा सांसदीय लोकशाहीयुक्त मार्ग अवलंबिलेला असतो. आंबेडकरवादाचा मुलाधार प्रत्यक्ष जीवन व्यवहारातील अनुभव, वास्तवता आहे. बौद्ध धम्मात या तत्त्वज्ञाचे मूळ शोधून त्याला आधुनिक विज्ञाननिष्ठेची जोड दिली. आंबेडकरवादाची उभारणी श्रमण संस्कृतीतून झाली आहे. व्यक्ती आणि समाज यांचा एकाच वेळी समन्वय करून कल्याण साधण्याचाच विचार आंबेडकरवादात आहे. 'आंबेडकरी नाट्य चळवळ-एक धावता आलेख' या लेखात डॉ. सुरेश खोब्रागडे म्हणतात, 'आंबेडकरी नाट्य चळवळीचा आरंभबिंदू आपल्याला समाज क्रांतिकारक ज्योतिराव फुले यांच्या 'तृतीय रत्न' या इ.स.1855 साली रंगभूमीवर आलेल्या नाटकाला द्यावे लागेल. 'आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळीची दशा आणि दिशा' या लेखात डॉ. नारायण कांबळे म्हणतात, 'आंबेडकरी चळवळीत सर्वंकष बदल घडवून आणण्याची क्षमता आहे. या चळवळीत विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रगल्भ विचारांची जोड आणि फुले, शाहू यांच्या विचारांचा वारसा तसेच गौतम बुद्धांच्या समतावादी वैश्विक तत्वज्ञानाची सोनेरी किनार आहे. ही चळवळ आज कोणत्या दिशेने भरकटत निघाली आहे. भर समुद्रात भरकटलेल्या जहाजाप्रमाणे का हेलकावे खात आहे, याचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे.' 'आंबेडकरी गायन कला चळवळ' या लेखात गोपीचंद कांबळे 'विद्यार्थी' लिहितात, मानवी जीवनात जे सुखद आणि आनंददायी अनुभव मिळालेले असतात तेच कलेच्या माध्यमातून प्रकट होतात. कला ही कलाकारांच्या आंतरिक भावना, अनुभव, विचार व कल्पनेवर अवलंबून असते. काव्यशिल्प, चित्र, नाट्य, संगीत, स्थापत्य वास्तू इत्यादी प्रकारांना कला असे नाव नामाभिधान आहे.' 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शोधनिबंधातील संदर्भ' या लेखात डॉ. भीमराव खाडे म्हणतात, 'कोलंबिया विद्यापीठातील मानवंशशास्त्र विभागाच्या वतीने प्रो.डॉ. गोल्डनवायझर यांनी आयोजित केलेल्या परिषदेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'भारतातील जाती, उत्पत्ती आणि प्रसार' हा त्यांचा पहिला शोध निबंध सादर केला. शंभर वर्षांपूर्वी सादर केलेला शोध निबंध, संशोधन पद्धती व तंत्र याचे सर्वोत्तम उदाहरण आहे. संशोधनपर लेख लिहिताना व तो संशोधन पत्रिकेमध्ये प्रकाशित करण्यासाठी आपण शीर्षक, संशोधनाचा सारांश, प्रास्ताविक संशोधन पद्धती व साधने, सांख्यिकीय निष्कर्ष, चर्चा, योगदान, संदर्भ आणि तांत्रिक बाबी यांचा समावेश करीत असतो. डॉ. अनंत राऊत यांनी 'संविधान प्रकृती'ची विटंबना हा राष्ट्रद्रोहच असल्याचे म्हटले आहे. तर 'पश्चिमी राजस्थान के दलित आंदोलनपर डॉ. बाबासाहेब आंबेडकर का प्रभाव' या लेखात गौतम ताराराम म्हणतात, 'राजस्थान मे दलित पँथर की विचारधाराके बारे में यहा के विद्यार्थीओंके बीच मे प्रसारित करना सुरू किया था और कॉलेज के होस्टेलमें जाकर विद्यार्थीओंके डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृष्टिकोन और कार्यप्रणाली को समझाते थे।'
याशिवाय प्रस्तुत विशेषांकात सामाजिक परिवर्तनाला अनुकूल विचार कवितांचा समावेश झाला आहे. यातील 'निसर्ग धर्म' ही माधव सरकुंडे यांची कविता धम्माचे महत्त्व अधोरेखित करणारी आहे. प्रस्तुत विशेषांकाच्या संपादकीय लेखात सुनंदा बोदिले यांनी म्हटल्याप्रमाणे, 'भारतीय समाजातील अनेक वंचित घटक आता आपल्या न्याय, मागण्यासाठी आंदोलने करीत आहेत. त्यांच्यात आपल्या हक्काची जाणीव निर्माण होत आहे, हे आंबेडकरी चळवळीचे यश आहे.' सदर विशेषांक वैचारिक माहितीने परिपूर्ण असून चिंतनीय आहे. त्यामुळे चळवळीतील कार्यकर्त्यांनी, अभ्यासकांनी विशेषत्वाने दखल घेऊन आपल्या संग्रही ठेवावे.
'मुक्तमंथन'-आनोडि -2024 'आंबेडकरी चळवळ विशेषांक'
संपादक-सुनंदा बोदिले, मो.9422956909
मूल्य-50/-रुपये, पृष्ठ-60 ■ ■

**मुक्त मंथन**




**समीक्षा**



**दिनेश कोटांगले**
मो.9834492541

## आंबेडकरी नावाएवढे प्रिय, श्रेष्ठ, महन्मंमंगल ऊर्जादायी दुसरे काहीच असू शकत नाही.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ संपादित केला आहे. त्यांच्या प्रथम आवृत्ती डिसेंबर 1993 च्या पान 527 वर डॉ. गंगाधर पानतावणे आपल्या डॉ. आंबेडकर दलित साहित्याचा प्रेरणास्त्रोत या लेखाचा शेवट करताना लिहितात, 'म्हणून दलित साहित्य निर्मितीचा प्रेरणास्त्रोत डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत.' ज्या साहित्य निर्मितीचा प्रेरणास्त्रोत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत ते साहित्य दलित कसे? आंबेडकरी का नाही? असे प्रश्न दलित अस्मितेची जोपासना करणाऱ्यांना कधीच पडले नाहीत. दुसरे उदाहरण मराठीतील दिग्गज कवी असलेल्या नामदेव ढसाळ यांचे देता येईल. 1,2,3 एप्रिल 2011 रोजी पुणे येथे भरलेल्या सम्यक साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांनी केलेल्या अध्यक्षीय भाषणात ते दलित साहित्याची बाजू हिरीरीने घेतांना लिहितात, 'त्याला तुम्ही दलित साहित्य म्हणा, फुले-आंबेडकरी साहित्य म्हणा अथवा सम्यक साहित्य, प्रगत डावे साहित्य म्हणा. पण या सर्वांचे बीज आहे ते दलित साहित्य. ढसाळांच्या या बीजभूमिकेचे विश्लेषण कसे करावे? कवितेतून प्रचंड विद्रोह करणारे पँथर दलित साहित्याचाच आग्रह का धरतात? आंबेडकरी साहित्य चळवळीत, आंबेडकरी सत्तेत त्यांचा जीव रमेनासा झाला. का? पोट भरण्यासाठी डॉ. बाबासाहेबांचे धरलेले बोट शेवटी शेवटी सुटले. का सोडावे लागले? ते त्यांचे त्यांनाच ठाऊक? दलित साहित्य या शब्दाच्या आग्रहामुळे पुढे चालून त्यांना पद्मश्री मिळाली. त्यांचे चांगभले झाले. पण त्यांनी प्रज्ञासूर्याच्या रथाचे सातच नव्हे तर शेकडो घोडे मारले. रक्तात पेटलेले कितीतरी अगणित सूर्य विझवले ते कायमचेच.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यापासून प्रेरणा घेतलेल्या समाजाने जो साहित्य प्रवाह निर्माण केला. त्या प्रवाहालाच आंबेडकरी साहित्य म्हणणे अधिक संयुक्तिक आहे. योग्य आहे. बंधु बहिणींनों, साहित्य आणि संस्कृतीचा अत्यंत जवळचा संबंध असतो. साहित्य हे संस्कृतीच्या अभ्यासाचे साधन असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समकालीन असलेले इटली देशातील अभ्यासक अंतानिओ ग्राम्शी यांनी सांस्कृतिक सत्ता किंवा सांस्कृतिक प्रभुत्त्व धुरिणत्व (कल्चरल हेजिमनीची) संज्ञा पुढे आणली. यालाच नव मार्क्सवाद असेही म्हणतात. मार्क्सने समाजव्यवस्थेचा पाया आर्थिक संबंध आहेत. आर्थिक संसाध ज्याच्या मालकीची असतात ते सत्तास्थानी असतात, अशी मांडणी केली होती. ग्राम्शीने सांगितले की आर्थिक संबंधांपेक्षा, आर्थिक सत्तेपेक्षा सांस्कृतिक सत्ता प्रभावी असते. सांस्कृतिक सत्तेची साधने ज्याच्याकडे असतात त्याचे नियंत्रण सर्व सत्तांवर असते. ग्राम्शीचे मत खरेच आहे. पण हे ग्राम्शीने पहिल्यांदा सांगितले नाही. ग्राम्शीच्या अगोदर कितीतरी वर्षआधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांस्कृतिक सत्तेचे महत्त्व आणि सामर्थ्य




ओळखले होते. त्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्याचा यशस्वी प्रयत्न केला होता. डॉ. बाबासाहेबांनी 'थॉटस ऑन लिंग्विस्टीक स्टेट'मध्ये एक महत्त्वाचा सिद्धांत मांडला होता. 'राजकीय डोलारा हा सामाजिक संरचनेवरती उभा असतो.' सामाजिक संरचना बदलायची असेल तर सांस्कृतिक बदल अपरिहार्य असतात. सांस्कृतिक बदल झाल्याशिवाय समाज बदलत नाही आणि सामाजिक संरचना बदलल्याशिवाय राजकीय सत्ता बदलत नसते. बदलता येत नाही. याची पुरेपूर जाण इ.स. पूर्व असलेल्या सम्राट अशोकाला होती. आपली राजकीय सत्ता अबाधित राहावी म्हणून त्यांनी प्रयत्नपूर्वक सांस्कृतिक प्रतिमा, प्रतीकांच्या मदतीने आपली राजसत्ता मजबूत केली. संस्कृतीचे व सांस्कृतिक सत्तेचे महत्त्वाचे घटक असलेला धर्म, जनमानस, धर्मग्रंथ, रुढी, रितिरिवाज समतेवर आधारित, लोककल्याणकारी कामे कशी होतील यासाठी आपली राजसत्ता वापरली. बुद्ध धम्माचा स्वीकार करून, त्या धम्माचा प्रसार, प्रचार केला. शिलालेखावर राजाज्ञा कोरून आपली राजसत्ता चिरस्थायी केली. हे ठाऊक असल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही चळवळ चालवतांना, नवसमाज निर्मितीसाठी नव्या सांस्कृतिक प्रतिमा, प्रतीकांची रचना केली. बहिष्कृत समाजाच्या स्वतंत्र नि पर्यायी संस्कृतीचा प्रकल्प उभा करण्याचा संकल्प केला. त्यातून महाड येथील सत्यागृहाच्या वेळी उपस्थित असलेल्या महिलांनी दागिने कोणते घालावेत, गुडघ्याच्या खालपर्यंत लुगडे कसे नेसावे, स्वच्छ, नीटनेटके कसे राहावे, आपले आचार-विचार इतरांपेक्षा चांगले कसे असावेत याचे धडे दिले. महार आई-बापा पोटी जन्म झाला याचा न्यूनगंड बाळगू नये. स्वाभिमानाने जगावे, वागावे असा मोलाचा सल्ला दिला. त्यांनी नियतकालिकांना दिलेली नावे, शाळ महाविद्यालयांना दिलेली नावे विचारपूर्वक दिलेली होती. सिद्धार्थ कॉलेज, मिलिंद कॉलेज, नागसेनवन या शब्दांना खूप खोल असा सांस्कृतिक संदर्भ होता. आहे. हरेक शब्दाला सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ, अर्थ असतो. दलित म्हणल्या बरोबर एका संबंध नरकाची परंपरा डोळ्यापुढे येते. संस्कारहीन, ज्ञानहीन, जनावरांसारखे जगणारे आणि किडामुंगीसारखेच मरणाऱ्या घेट्टोतील जगण्याची परंपरा डोळ्यासमोर येते आणि दुसरीकडे आंबेडकरी साहित्य बुधवाडा, जयभीमनगर, आंबेडकर नगर म्हटले की पन्नास साठ वर्षात नेत्रदिपक प्रगती केलेला समाज, एकेकाळी तराळ असलेली ही माणसे अंतराळात झेपावताना पाहून लोक आश्चर्यचकीत होतात. हा आंबेडकरी संस्कृतीचा संदर्भ आणि अर्थ आहे.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मतानुसार भारताचा इतिहास म्हणजे, क्रांती आणि प्रतिक्रांतीचा इतिहास आहे. भारतात हजारों वर्षांपासून दोन संस्कृती नांदत आहेत. त्यांच्यात सतत संघर्ष चालू असतो. वैदिक संस्कृती व दुसरी अवैदिक संस्कृती. अवैदिक संस्कृतीलाच श्रमण संस्कृती असे म्हणतात. वैदिक संस्कृती वेद, श्रुती, स्मृती, उपनिषदे, पुराणे, गीता, यज्ञयागादी, कर्मकांडे, स्वर्ग, नरकाच्या कल्पना आणि स्त्रिया व शूद्रांच्या द्वेषावर आधारित आहे. वर्णवर्चस्ववादी वृत्तीमुळे वैदिक संस्कृतीने स्वतःभोवती कडेकोट कुंपण घालून घेतले आहे. इतरांवर ज्ञानबंदी, व्यवसायबंदी, संचारबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी लादली गेल्यामुळे या देशातील बहुजन समाजातील प्रतिभावंतांचे नवनिर्मितीचे झरे बंद झाले. त्यांच्या कलागुणांना अवकाश न मिळाल्यामुळे ते करपून गेले. या बंधनामुळे हजारो वर्षांचा इतिहास असलेल्या वैदिक परंपरेतून जागतिक दर्जाचा एकही कलावंत, कवी, नाटककार निर्माण झाला नाही. त्यांनी लिहिलेल्या ज्योतिषशास्त्र, व्याकरण, व्रतवैकल्यावरील ग्रंथांनी बहुजनांच्या दुःखी, कष्टी जीवनात काडीचाही फरक पडला नाही. वैदिक परंपरेने देशातील तमाम जनतेची विचारप्रक्रिया सर्जनशक्तीच मारून टाकली. ज्ञानाच्या प्रवाहाला बांध घातले. बांध घातले माणुसकीला मानवतेला, समतेला, बंधुभावाला. या कूपमंडुक वृत्तीमुळे देशावर परकीय शक्तींनी वारंवार आक्रमणे केली. या उलट अवैदिकांची संस्कृती, जिला आपण श्रमण संस्कृती म्हणतो, श्रम करणाऱ्यांची संस्कृती ती श्रमण संस्कृती. लोकभाषेतून संवाद लेखन, विचारांचा प्रसार-प्रचार करणाऱ्यांची संस्कृती म्हणजे श्रमण संस्कृती. या संस्कृतीतील प्रतिभावंतांनी लेखक, कवींनी सर्वसामान्य माणसांची दुःखे, व्यथा, वेदना दूर करण्याचा प्रयत्न केला. शोषण परंपरांचे स्वरूप जाणले, कारणे शोधली. ही कारणे दूर करण्याचा आपापल्या परीने प्रयत्न केला. लोकोपयोगी ज्ञान सर्वांसाठी खुले ठेवले. झाडपाल्याची औषधी देणाऱ्या या परंपरेतील प्रतिभावंतांनी वैदिक शास्त्राचे ज्ञाने पुढे नेले. विचारप्रक्रिया व ज्ञानप्रक्रिया खुली झाल्यामुळे माणसांची मने स्वतंत्र झाली. मुक्तपणे विचार करू लागली. यातूनच कलासाहित्याच्या निर्मितीला प्रारंभ झाला. संगीत, साहित्य, चित्र, शिल्प या कलांचा उदय बुद्धकाळात नि त्यानंतरच्या काळातच का झाला. याचीही पार्श्वभूमी ही अशी आहे. भारतातीलच नव्हे तर जगातील बहुतांश देशातील विविध कलांचे प्रेरणास्थान उद्गाता म. बुद्धच आहे. बुद्धांची लोककल्याणकारी शिकवण, विचारधारा सर्व समाजाच्या उपयोगाची होती. बहुजन हिताय, बहुजन सुखाय असलेली ही शिकवण दुःखी, कष्टी, शोषित माणसांपर्यंत पोहोचावी, त्यांच्या जीवनात, मनात आनंद लहरी निर्माण व्हाव्यात म्हणून धम्म सर्वदूर पोहचवण्यासाठी बुद्धाने निःस्वार्थ सर्वसंग परित्याग केलेल्या अभ्यासू, व्यासंगी आणि प्रामाणिक भिक्खुची संघटना उभी केली. या संघामुळे देशाच्या कानाकोपऱ्यात बुद्ध विचार पोहचले. त्यांच्या विचारधारेपुढे वैदिक परंपरा, विचारधारा निष्प्रभ झाली. बुद्धाच्या धम्माची प्रेरणा ही दुःख मुक्तीची होती. पंथ प्रसाराची नव्हती. त्यामुळे सर्व समाज बुद्धाच्या विचाराकडे धम्माकडे आकर्षित झाला.



**प्रकाश मोगले**

बुद्धानंतर आचार-विचारात अजिबात अंतर नसलेला त्यांच्या उंचीचा शास्ता मार्गदर्शक न उरल्यामुळे धम्मात विविध पंथ निर्माण झाले. तत्कालीन लोकांच्या भाषेत पाली, मागधीत असलेली बुद्धांची मूळ शिकवण संस्कृत भाषेत देणे सुरु झाले. त्या काळात संस्कृत भाषा जाणणाऱ्या शास्त्री पंडितांचा भरणा भिक्खु संघात होता. त्यांनी संस्कृत भाषेत बुद्धाची शिकवण सांगताना मूळ शिकवण विकृत केली. आचार विचाराचेही विकृतीकरण सुरु झाले. विनयातील नियमांच्या विरुद्ध थेरो, महाथेरो वर्तन करू लागले. भिक्खु संघात अनिती बोकाळल्यानंतर सर्वसामान्य जनता भिक्खू संघाचा आदर करेनाशी झाली. विहारात, संथागारात, मठे स्थापन करून राजे महाराजांनी, गावातील धनिकांनी दिलेल्या दानावर भिक्खु संघ ऐश आरामात राहू लागला. तंत्रयान, सहजयान, वज्रयान हे तांत्रिक जादू टोना करणारे, योग विद्येद्वारे लोकांना दुःख मुक्तीची लालूच दाखविणारे अनिष्ट प्रकार सुरु झाले. पंच मकारात रममान झालेले भिक्खु लोकांच्या आदरास पात्र राहिले नाहीत. त्यांचा लोकाश्रय संपला. या परिस्थितीचा फायदा वैदिकांनी घेतला. वैदिक संस्कृतीवाले टपूनच बसलेले होते. त्यांना बौद्ध भिक्खूंनी आपल्या वर्तनाने आयतीच संधी प्राप्त करून दिली. इ.स.पूर्व 185 मध्ये राजा बृहद्रथाचा खून करून पुष्यमित्र शुंगाने मगध साम्राज्याची सत्ता हाती घेतली. बुद्ध धम्माचा नायनाट करण्याची शपथ घेवून त्यांनी वैदिक संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले. येथून पुढे क्रांति-प्रतिक्रांतीची धुमःश्चक्री सुरु झाली. कधी वैदिक संस्कृतीचे तर कधी श्रमण संस्कृतीचे पारडे जड होऊ लागले. काही काळ बुद्ध धम्माची पिछेहाट झाली. पहिल्या शतकात अश्वघोषाने महाकाव्याच्या धर्तीवर बुद्धचरित्र व सौंदरानंद ही दोन अजोड अशी महाकाव्य लिहिली. जातीभेदाचे खंडन करणारा वज्रसूची नावाचा ग्रंथ लिहिला. महायान पंथाची स्थापना केली. परत काही वर्षानंतर शंकराचार्यांनी प्रतिक्रांती केली. हर्षवर्धनच्या काळाच्या आसपास सिद्ध, योगी, नाथपंथी यांनी वैदिक संस्कृतीला कडवा विरोध केला. भक्तीच्या द्वारे सर्वसामान्यांना आत्मोद्धाराचा मार्ग सांगितला. त्यानंतर दक्षिणेत जैन, लिंगायत या अवैदिक पंथांनी वैदिक संस्कृतीला शह दिला. त्याच काळात आपल्याकडे महानुभाव पंथाने देवगिरीच्या यादव राजाचा आश्रय असतांना वैदिक संस्कृतीविरुद्ध फार मोठे बंड केले. मराठीतील आद्य, पद्य आणि गद्य ग्रंथ लिहिण्याचे महत्त्वाचे कार्य महानुभावीय लोकांनी केले. तेराव्या शतकात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि संत मेळ्याने वारकरी पंथाची स्थापना करून वैदिक परंपरेला व महानुभावी परंपरेलाही चेक दिला. नामदेवानंतरचा मोठा संत म्हणजे तुकाराम. अवघ्या बेचाळीस वर्षाच्या आयुष्यात संत तुकारामाने मराठी संस्कृतिला व्यवस्थित आकार दिला. मराठी भाषेला अमृतातेही पैजेशी जिंकेल असे सामर्थ्य मिळवून दिले. त्यानंतर ब्रिटिशांच्या काळातील आक्रमणाने आपला देश मध्ययुगातून एकदम आधुनिक युगात आला. इंग्रज आले नसते तर आपले मध्ययुग अजूनपर्यंत सुरूच राहिले असते. इंग्रजांनी दिलेल्या आधुनिक दृष्टीमुळे केलेल्या सुधारणांमुळे झोपेत असलेला भारतीय समाज, देश खडबडून जागा झाला. यातून भारतीय साहित्य संस्कृतीची, धर्माकर्माची वैदिक परंपरेची कठोरपणे चिकित्सा करणारे म. फुले निर्माण झाले. सावित्रीबाई फुले निर्माण झाल्या. त्यांनी वैदिक परंपरेची, धर्मग्रंथांची कठोर भाषेत चिकित्सा केली. बहुजनांच्या अज्ञानाचे कारण अविद्या असल्याचे निदान केले. यावर उपाय म्हणून शूद्रातिशूद्रांसाठी व महिलांसाठी शाळा काढल्या. विद्येचे महत्त्व पटवून दिले. **क्रमशः** ■ ■

## महत्वाचे

## महाड क्रांतिदिनी बसपाचे अभिवादन




**नागपूर :** स्वातंत्र्यापूर्वी करोडो अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्याचा हक्क व अधिकार नव्हता. तो मिळविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 19 व 20 मार्च 1927 रोजी कुलाबा जिल्ह्याच्या महाड येथे बहिष्कृत परिषद घेऊन 20 मार्च रोजी चवदार तळ्यावर तो हक्क बजावला. त्या महाड सत्याग्रहाची आठवण म्हणून बसपाच्या कही हम भूल ना जाये या राष्ट्रीय अभियानांतर्गत संविधान चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

महाराष्ट्र प्रदेश बसपाचे उत्तम शेवडे यांचे अध्यक्षतेखाली, रंजना ढोरे, चंद्रशेखर कांबळे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात हा अभिवादन झाले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना उत्तम शेवडे यांनी सांगितले 1923 ला रावसाहेब सी. के. बोले यांनी मुंबई प्रांतिय असेम्ब्ली मध्ये सार्वजनिक देवळे व पानवठे अस्पृश्यांसाठी खुले केल्याचा निर्णय घेतला होता. त्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे सोपवली होती. त्यानुसार 1924 ला महाड नगरपालिकेने सुद्धा तसा ठराव पास केला होता. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हीही माणसे आहोत, पाणी पिणे हा आमचा मानवाधिकार आहे, हे दाखविण्यासाठी महाडच्या चवदार तळ्यावर अस्पृश्यांचा बहिष्कृत हितकारणी सभेच्या वतीने 19 व 20 मार्च 1927 रोजी सत्याग्रह पुकारला होता अशी माहिती दिली.

याप्रसंगी युवानेते सदानंद जामगडे, पूर्व नागपूरचे अध्यक्ष मुकेश मेश्राम, महासचिव सचिन मानवटकर, दक्षिण नागपूरचे अध्यक्ष जितेंद्र पाटील, मध्य नागपूरचे प्रभारी अभय डोंगरे, प्रवीण पाटील, पश्चिम नागपूरचे प्रभारी मनोज गजभिये, नागपूर शहराचे माजी प्रभारी विकास नारायणे, सुरेखा मेश्राम, शौर्य मेश्राम, बामसेफचे भानुदास ढोरे, सिद्धार्थ फोपरे आदी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अभिलेश वाहाने यांनी तर समारोप नितीन वंजारी यांनी केला.

## सूर सरगम म्युझिकल ग्रूपचा सांस्कृतिक कार्यक्रम साजरा



**नागपूर :** सुर सरगम म्युझिकल गृप आयोजित 'होली के रंग सूर सरगम के संग' विदर्भ हिंदी साहित्य संमेलन नागपूर येथील अर्पण हॉलमध्ये आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात साई तुला खांद्यावार घेईन, तुला पालखीत नेईन या भक्तीगीताने झाली. या होळी मिलन कार्यक्रमात, 30 गाण्यांची संचालन रीना पुरी, यांनी सुरुवातीपासून शेवटपर्यंत निभवले. हा कार्यक्रम सुर सरगम म्युझिकल गृपचे संचालक नितीन बिरहा आणि संस्थापक रमेश दुबे यांनी आयोजित केला होता. या कार्यक्रमात अतिथि गायिका पल्लवी दौतखानी यांनी विशेष सहकार्य केले आणि स्टार गायक अमर बरसे, सतीश खरे, धीरज घिचरे, महेश येठे, पंकज नकाशे, सुनील समुंद्रे, कमलाकर कोल्हेकर, प्रकाश जिकार, धीरज डेलीकर, मनोज पुरी, धनराज तिडके, गणेश पाठक व महिला गायिका उर्मिला घिचरे, ज्योती गजभिये, नयन व्यास, दिशा टिकेकर, बबिता कारोकर यांनी क्रमानुसार गाणी सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. सूर सरगम म्युझिकल गृपचे संचालक नितीन बिरहा यांनी सर्व प्रेक्षकांचे आणि संगीतकार टीम राजेश दामनकर, अजित भालेराव, सूरज मोगरे, पवन राज आणि सहभागी गायकांचे व मंच संचालिका रीना पुरी यांचे कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल आभार मानले.

### राजगृह बहुउद्देशीय धम्मिका महिला समिती तर्फे

## सावित्रीबाई फुले स्मृती अभिवादन!



**नागपूर :** राजगृह बहुउद्देशीय धम्मिका महिला समिती तर्फे सुभाष नगर येथे जागतिक महिला दिन आणि सावित्रीबाई फुले स्मृतीदिन झाला. त्या निमित्ताने प्रमुख पाहुणे प्रा. माधुरी गायधनी होत्या. माधुरी गायधनी महिलांना मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की घराबाहेर पडून आंबेडकरी महिलांनी चळवळीत सहभागी व्हावे. डॉ. बाबासाहेबांचा महिलांवर विश्वास होता. समाज सुधारण्याची फार मोठी जबाबदारी महिलांची आहे असे असतांना आज आमच्या महिला फार लवकर सुखावून गेलेल्या आहेत. येणाऱ्या परिस्थितीची त्यांना अजिबात जाणिव दिसत नाही. हे समजावून त्यांनी उपस्थित महिलांचे अभिनंदन केले. भरोसा सेलच्या रीना कॉन्स्टेबल यांनी विचारांची देवाणघेवाणांची मांडणी केली. महिला विषयक भरोसा सेल अंतर्गत असलेल्या उपक्रमाची माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्ष उषा बौद्ध म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ही हिंदू कोड बीलामधून हक्क अधिकार दिले आहेत. त्यामुळे महिलांनी घराच्याबाहेर पडून डॉ. बाबासाहेबांची चळवळीला साथ द्यावी अशी गंभीर हाक दिली. संचालन भारती धोटे तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्योत्स्ना भगत यांनी केले. आभार प्रदर्शन पौर्णिमा कावरे यांनी केले. कार्यक्रमाला नलू धोटे, भाग्यश्री बोरकर, शिला कावरे, वच्छला तभाने, बेबी बोरकर, खुशी बोरकर, हर्षा चिमणे, सुरेखा गायकवाड, मनिषा धोटे, कांबळे, संगिता निमगडे, शोभा दहाट, सविता इंगोले, रोशनी दहाट यांनी सहभाग दिला.

# राष्ट्रीय पाली परिषदेत आठ ठराव पारित

**नागपूर :** पालि प्राकृत विभाग, बुद्धिस्ट स्टडीज सेंटर रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर, डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कामठी रोड, नागपूर तथा पालि प्रचारिणी सभा, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय राष्ट्रीय पालि परिषद दीक्षांत सभागृहात आयोजित करण्यात आली होती. परिषदेच्या उद्घाटकीय सत्राचे अध्यक्षस्थान प्र. कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे यांनी भूषविले. बीजभाषण डॉ. महेश देवकर, पुणे यांनी केले. समारोपीय सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. पूरणचंद्र मेश्राम यांनी भूषविले. यावेळी मंचावर डॉ. महेश देवकर, डॉ. प्रज्ञा बागडे, डॉ. तलत प्रवीण, डॉ. नीरज बोधि आदी उपस्थित होते. या परिषदेत विविध स्कॉलर्स आणि संशोधकांनी आपले शोध निबंध सादर केले. या परिषदेमध्ये 8 ठराव पास करण्यात आले, त्याला उपस्थितांनी सर्वानुमते मंजुरी दिली.



**ठराव क्रमांक** 1) पाली भाषेच्या विकासाकरिता महाराष्ट्र सरकारने केंद्र शासनाच्या शैक्षणिक धोरणाच्या अधीन राज्य पातळीवर विशेष धोरण तयार करावेत. पाली भाषेच्या विकासाकरिता विविध योजनांसाठी आर्थिक तरतूद करावी. ठराव क्रमांक 2) पाली भाषेचा सार्वत्रिक विस्तार होऊन भारतीय ज्ञान परंपरा समृद्ध व्हावी याकरिता इयत्ता पहिलीपासून पाली भाषेचे अभ्यासक्रम तयार करून शालेय स्तरावर अध्यापनाची तरतूद करावी. ठराव क्रमांक 3) पहिल्या वर्गापासून पाली शिकविणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी याकरिता डी. एड. ला पाली विषय सुरू करण्यात यावा. ठराव क्रमांक 4) महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये पूर्णकालीन रिक्त पदे भरण्यात यावी आणि जिथे पदे नसतील, तेथे नवीन पदे भरून पाली भाषा विभाग सुरू करण्यात यावे. ठराव क्रमांक 5) पाली विषयाच्या संशोधन वृत्तीसाठी विशेष आर्थिक तरतूद करण्यात यावी. ठराव क्रमांक 6) पाली भाषेतील ग्रंथांचे मराठी व इतर भारतीय भाषांमध्ये अनुवाद करण्यासाठी योजना तयार करून त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात यावी. ठराव क्रमांक 7) दुरस्थ आणि ऑनलाईन पद्धतीने अध्यापनासाठी व्यवस्था निर्माण करण्यात यावी. ठराव क्रमांक 8) भारतीय ज्ञान परंपरेनुसार पालीतील समृद्ध ज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने पालीचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन होणे गरजेचे आहे. याकरिताच महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र पाली विद्यापीठ स्थापन करण्यात यावे. हे ठराव राज्य शासनाकडे पाठविण्यात आले.



## तथागत बौद्ध विहार समिती द्वारा महिलांना 'धम्म सेविका' पुरस्कार प्रदान

**नागपूर :** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने हुडकेश्वर रोड परिसरातील धम्माचे कार्य करणाऱ्या महिलांना 'धम्म सेविका' हा पुरस्कार देऊन सम्मानित करण्यात आले. तथागत बौद्ध विहार, प्रेरणानगर समितीचे अध्यक्ष प्रा. नाना शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार वितरण झाले. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी समाजसेवक डॉ. प्रा. सरोज डांगे, ॲड. स्मिता कांबळे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. धम्मसेविका हा पुरस्कार प्रामुख्याने जयश्री गणवीर, सुनंदा रायपुरे, निर्मला गजभिये, प्रा. प्रीति तिरपुडे, शांता कांबळे, सुरेख शंभरकर यांना मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन रिंधिमा माटे यांनी तर प्रास्ताविक डॉ. विलास धबाले आणि आभार शिल्पा गायंडे यांनी मानले. याप्रसंगी मोठ्या संख्येने महिला आणि उपासक उपस्थित होते.



रमाईचे स्वप्न-37

### सम्राट अशोक बुद्ध विहार

महात्मा फुले कर्मचारी वसाहत नागपूर. दररोज 7 ते 14 वयोगटातील विद्यार्थ्यांचे कराटे प्रशिक्षण, विद्यार्थ्यांसाठी नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी, नियमितपणे सामुदायिक बुद्ध वंदना व संविधानाची उद्देशिका वाचन, प्रत्येक पोर्णिमेचे आयोजन, बुद्ध आणि त्यांचा धम्म यावर आधारित प्रश्न - मंजुषा, विद्यार्थ्यांना विविध संघटनांकडून, आर्थिक मदत, सहलीचे आयोजन, 14 एप्रिल, बुद्ध जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन.

संवाद मित्र सुधाकर स्थूल मो.9372665640

## महावितरणला सर्वोत्कृष्ट वीज वितरण कंपनीचा पुरस्कार




**नागपूर :** महावितरणला शनिवारी नवी दिल्ली येथे केंद्रीय सिंचन व ऊर्जा मंडळातर्फे (सीबीआयपी) सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारी वीज वितरण कंपनी म्हणून गौरविण्यात आले. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी महावितरणचे कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर उपस्थित होते. महावितरणच्या गौरवाबद्दल अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचे आभार मानले तसेच महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. महावितरण मुंबईचा काही भाग वगळता संपूर्ण राज्याला वीज पुरवठा करते. महावितरणचे घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक आणि कृषी असे 3 कोटी 11 लाख ग्राहक आहेत. महावितरण देशातील सर्वात मोठी वीज वितरण कंपनी आहे. वीज उपकेंद्रांची संख्या वाढविणे, त्यांची क्षमता वाढविणे, नव्या वीज वाहिन्यांचे जाळे उभारणे, वितरण रोहित्रांची उभारणी तसेच वीज वितरण व्यवस्थेत केलेली सुधारणा यांचाही विचार महावितरणचा सन्मान करताना करण्यात आला. मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेच्या माध्यमातून सौर कृषी पंप बसविण्यात महावितरणने देशात प्रथम स्थान मिळविले आहे. उपसा सिंचन योजना सौर ऊर्जेवर चालविण्यासाठीच्या राज्य सरकारच्या योजनेसाठी महावितरणला नोडल एजन्सी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. महावितरणने राज्यात विद्युत वाहनांसाठी 63 चार्जिंग स्टेशन्स राज्यात उभारली आहेत.

# फक्त मुस्लिमांवरच देशद्रोहाचे गुन्हे का? ठाकरेंचा सरकारवर निशाणा

**नागपूर :** नागपूरच्या दंगलीला कोण जबाबदार आहे? फक्त मुस्लिमांवरच देशद्रोहाचे गुन्हे का दाखल करण्यात आले? ज्यांनी लोकांच्या भावना भडकावल्या त्या विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना का सोडून देण्यात आले? असे प्रश्न उपस्थित करून काँग्रेसच्या सत्यशोधन समितीचे अध्यक्ष तसेच गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे यांनी राज्य सरकारवर पक्षपातीपणाचा आरोप लावला. यावेळी त्यांनी हिंदू संघटनेच्या कार्यकर्त्यांना दंगलीच जबाबदार धरून राष्ट्रद्रोहाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी देखील त्यांनी केली. राज्यात शांतत राखणे व कायदा व सुव्यवस्था राखणे हे सराकराचे प्रथम कर्तव्य आहे. मात्र सरकारमधील मंत्रीच दंगलीस चिथावणी देऊन लोकांना भडाकावत आहेत. जाती धर्मांमध्ये तेढ निर्माण करून राज्यातील शांतता व भाईचारा संपवत असल्याने हे सरकार बराखास्त करावे, अशी मागणी ठाकरेंनी केली. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष राज्यपालांना भेटून सरकार बरखास्त करण्याची मागणी करणार आहे. सत्यशोधन समितीच्या माध्यमातून आम्ही नागपूरच्या दंगलीस कोण जबाबदार याचा अहवाल सादर करणार आहोत. याकरिता हिंदू आणि मुस्लिम दोन्ही समाजातील लोकांकडून माहिती घेतली. घटनाक्रम जाणून घेतला. कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी सरकारची आहे. मात्र सरकारमधील मंत्रीच बेजबाबदार वक्तव्य करीत आहेत. राज्यातील बुधभाव उद्धवस्थ करण्याचे प्रयत्न केले जात आहे, असे माणिकराव ठाकरे म्हणाले. औरंगजेबाची कबर खोदून काढावी, अशी मागणी सातत्याने केली जात आहे. मात्र त्यावर कोणी फारशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या नाहीत. मुस्लिमांनी विरोधही केला नाही. असे असताना नागपूरमध्ये कबरीवरून आंदोलन करण्याची गरज नव्हती. त्यासाठी पोलिसांनी परवानगी का दिली? असा प्रश्न उपस्थित होतो. कोणी हिंसक आंदोलन करीत असेल, पुतळे जाळत असतील तर पोलिस त्यांना आधीच अटक करतात, आंदोलन हाणून पाडतात. मात्र नागपूरमध्ये उघडपणे पुतळा जाळण्यात आला. त्याकरिता कुराणाचे आयात असलेल्या चादरीचा वापर करण्यात आला. मुस्लिमांच्या आस्थेला ठेच पोहचवली. याचीही गंभीर दखल पोलिसांनी घेतली नाही, असे देखील ठाकरे म्हणाले. ज्यांनी चादर जाळून नागपूरमधील शांतता भंग केली, दोन धर्मात भांडणे लावली त्यांच्यावरही मात्र गुन्हे दाखल करण्यात आले नाहीत. त्यांना शरण यायला लावले, जुजबी गुन्हे दाखल करून सोडून देण्यात आले. त्यानंतर या घटनेशी काश्मीर, बांगलादेशाशी या घटनेचा संबंध जोडून दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे सरकर जाती, धर्मात भेदभाव करीत आहेत. सर्वच आघाड्यांवर सरकार अपयशी ठरले आहे. कायदा व सुव्यवस्थया सरकारला राखता आला नाही. त्यामुळे हे सरकार बरखास्त करण्याची मागणी काँग्रेसच्यावतीने राज्यपालांकडे केली जाणार असल्याचे माणिकराव ठाकरे यांनी सांगितले. यावेळी विकास ठाकरे, प्रफुल गुडधे, आमदार साजिद पठाण, अतुल लोंढे, गिरीश पांडव, प्रशांत धवड, संजय महाकाळकर, अतुल कोटेचा आदी उपस्थित होते.



# 19 वे निवासी तीन दिवशीय विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास शिबिर



**लाखांदूर :** बहुजन प्रबोधन मंच, लाखांदूर व नागवंश बहुउद्देशीय संस्था, नागपूरकडून परसोडीनाग येथे होळी, धुलीवंदन व पाडव्याच्या दिवशी जीवनावश्यक विविध पैलूंवर मार्गदर्शनार्थ आयोजित केलेले 19 वे निवासी तीन दिवसीय विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास शिबिर अत्यंत शांततेत व सुरळीत झाले.

होळीच्या दिवशी इंजि. सुषमा भड, नागपूर, राष्ट्रीय ओबीसी महिला महासंघ अध्यक्षतेखाली अनिता चंद्रशेखर बोरकर, सरपंच परसोडी नाग. यांनी शिबिराचे उद्घाटन केले. याप्रसंगी डॉ. विना नगराळे नागपूर, रवी मानव, गुरुकुंज मोझरी, ज्ञानेश्वर रक्षक, नागपूर, रा.तु.म. साहित्याचे गाढे अभ्यासक यांनी शिबिरार्थींना मोलाचे मार्गदर्शन केले. संचालन अजय राखुंडे व आभार अंकित बांगरे यांनी केले.

धुलीवंदनाच्या दिवशी मेघश्याम मुरकुटे, प्राध्या. नानाजी जोशी कनिष्ठ महा., शहापूर यांच्या अध्यक्षतेखाली रवींद्र लोणारे, गडचिरोली, डॉ. सुरेश डोहणे, प्राध्या. राजे विश्वेश्वरराव महा., भामरागड, पुरुषोत्तम बगमारे, नागभीड, से.नि.शिक्षक, पंकज ठाकरे, संस्थापक अध्यक्ष, कर्मयोगी फाउंडेशन, बुटीबोरी यांनी विद्यार्थ्यांना व उपस्थितांना बहुमोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी कर्मयोगी फाउंडेशन कडून 25 आधार काठ्या वृद्धांना भेट देण्यात आल्यात. संचालन शुभम बोरकर व आभार प्रदर्शन अमर प्रधान यांनी केले.

पाडव्याच्या दिवशी अनिल काणेकर, लाखांदूर यांच्या अध्यक्षतेखाली बी. पी. कोचे, नागपूर, इंजि. रूपचंद रामटेके, भंडारा, जिल्हाध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा, विष्णुदास लोणारे, भंडारा, बुवाबाजी विभाग, राज्य सहकार्यवाह, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, तुळशीदास भानारकर, चिचोली, ग्रा.पं. अधिकारी, पाहूणगाव तथा मार्गदर्शक, कर्मयोगी फाउंडेशन, बुटीबोरी यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. या शिबिरात रोज डॉ. बी. पी. कोचे, योगतज्ञ, नागपूर यांनी शिबिरार्थींना योग, प्राणायाम, ध्यान, विपश्यना इत्यादीचे धडे देण्यात आलेत. यानंतर, शिबिराचे आयोजक अनिल कारुजी काणेकर, अध्यक्ष, बहुजन प्रबोधन मंच, लाखांदूर, तथा नागवंश बहुउद्देशीय संस्था, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली समारोपीय कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी बोलताना त्यांनी निवासी विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यामागची भूमिका विशद केली. विद्यार्थ्यांनी नेहमी सकारात्मक विचार व विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन जोपासून समाजात सदवर्तन करण्याचे आवाहन केले. या शिबिरात विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या संस्कारदीप संवर्धक परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्यांना तसेच सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना पुस्तके भेट देण्यात आलीत.

या तीन दिवसीय शिबिरामध्ये मान्यवर मार्गदर्शकांनी जीवनात अभ्यासाचे महत्त्व, इंग्रजी भाषेचे महत्त्व, संताच्या विचारांचे महत्त्व, निर्व्यसनी जीवन जगण्याचे महत्त्व, व्यक्ती हा माणूस, मानव व महामानव कसा बनतो हे सांगितल्याबद्दल व विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन विकसित करणे, अंधश्रद्धा नष्ट करणे या व इतर जीवनावश्यक विविध बाबीसंबंधीचे मार्गदर्शन झाल्याबद्दल यावेळी प्रगती पारधी, प्रिती ठाकरे, वैष्णवी ठाकरे, स्वरा आलोणे या विद्यार्थिनींनी तर प्रभुजी दाणे, धर्मराज नाकतोडे, अशोक गजभिये, सदाराम दिघोरे, अनिता बोरकर सरपंच, ज्येष्ठ नागरिकांनी शिबिर आयोजनाबद्दल समाधान व्यक्त करतांना शिबिरात दिलेले विचार खूपच मोलाचे असल्याचे सांगून अजूनपर्यंत असे मौलिक विचार ऐकले नसल्याचे सांगितले व पुन्हा अशा शिबिराची गरज व्यक्त करुन आयोजकाला धन्यवाद दिले.

अशोक भजने, संघटक, बहुजन विद्यार्थी संघ यांनी आपल्या भावना व्यक्त करतांना 'आपण काणेकर सरांच्या सानिध्यात आल्यामुळेच फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांची व संविधानाची ओळख झाली, तिथूनच आपल्या जीवनात सकारात्मक आमूलाग्र बदल झाल्याचे सांगितले.' कार्यक्रमाचे संचालन अजित वैद्य व आभार प्रदर्शन शिवा खोब्रागडे यांनी केले. शिबिराचे यशस्वीतेसाठी बहुजन विद्यार्थी संघाचे कार्यकर्ते व गावातील सुजाण नागरिकांनी मोलाची मदत केली.

### काँग्रेसच्या सत्यशोधन समितीला पोलिसांनी रोखले

# नागपूरच्या दंगलग्रस्त भागात जाण्यास मज्जाव

**नागपूर :** औरंगजेबाच्या कबरीवरून नागपूरमध्ये उसळलेल्या दंगलीवरून आता राजकीय आरोप-प्रत्यारोपाला सुरुवात झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही दंगल पूर्वनियोजित होती, असा दावा विधानसभेत केला आहे. या घटनेला हिंदू विरुद्ध मुस्लिम असे स्वरूप दिले जात आहे. या घटनेमागची सत्यात जाणून घेण्यासाठी काँग्रेसने एक सत्यशोधन समिती स्थापन केली आहे. ही समिती शनिवारी नागपूरमध्ये दाखल झाली आहे. मात्र, समितीला दंगलग्रस्त भागात जाण्याची पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. या परिसरात संचारबंदी लागू आहे. त्यामुळे कोणालाही जाता येणार नाही. कायद्याचे उल्लंघन केल्यास फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिस आयुक्तांनी काँग्रेसच्या समितीला दिला. त्यामुळे सत्य शोधन समितीने रविभवन येथे बैठक घेऊन विविध भागातील नागरिक आणि कार्यकर्त्यांसोबत चर्चा केली. काँग्रेसच्या सत्यशोधन समितीचे अध्यक्ष गोव्याचे प्रभारी आणि माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे समितीचे सदस्य साजिद पठाण, शहर काँग्रेसचे अध्यक्ष आमदार विकास ठाकरे, काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव प्रफुल गुडधे यांनी रविभवन येथे बैठक घेतली. माणिकराव ठाकरे म्हणाले, 'आम्ही सत्य जाणून घेण्यासाठी नागपूरमध्ये आलो आहोत. नागपूर शहरात शांतता राहावी असेच आमचे प्रयत्न आणि इच्छा आहे. मात्र, पोलिसांनी आम्हाला सत्य जाणून घेण्यापासून रोखले. ही राज्य सरकारची दडपशाही आहे. मात्र, सत्य शोधण्यासाठी आमची चार दिवस नागपूरमध्ये थांबण्याची तयारी आहे. आज ना उद्या केव्हा तरी दंगलग्रस्त भागात जाऊ. आम्ही नेमके काय घडले, कोणामुळे घडले, प्रशासन आणि पोलिसांची भूमिका या सर्वांचा बारईकाने अभ्यास करू.' तत्पूर्वी आम्ही काँग्रेसचे कार्यकर्ते आणि इतर जणांचे म्हणणे ऐकून घेतले. त्याच्या नोंदी करून ठेवण्यात आल्या आहेत. जे काँग्रेसचे नाही त्यांनाही आम्ही बोलावले होते. त्यांच्याशीसुद्धा चर्चा केली. आम्ही सत्य शोधन समितीचा अहवाल प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे सादर करू. तो अहवाल राज्यपालांकडे सादर केला जाणार असल्याचे ठाकरे म्हणाले.



लोकांसोबत केलेल्या चर्चेवरून या दंगलीस विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाचे कार्यकर्ते जबाबदार असल्याचे दिसून येते. कुराणाचे आयात असलेली चादर जाळण्यात आली. त्यामुळे मुस्लिमांचा भावना दुखावल्या. पोलिसांनी एकतर संवेदनशील भागात आंदोलनाची परवानगीच द्यायला नको होती. आंदोलन झाल्यानंतरही सुरक्षेची जबाबदारी पोलिसांनी प्रामाणिकपणे पार पाडल्याची दिसत नाही, असे माणिकराव ठाकरे म्हणाले.

बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांवर कुठलीच कार्यवाही केली नाही. पक्षपातीपणाचा आरोप होऊ नये याकरिता पाहुण्यांप्रमाणे बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना पोलिस ठाण्यात बोलावून घेण्यात आले. जुजबी कलम लावून त्यांना सोडून देण्यात आले. मात्र, दुसरीकडे मुस्लिम समाजाच्या कार्यकर्त्यांना थेट देशद्रोहाचे गुन्हे दाखल केले असल्याचे माणिकराव ठाकरे यांनी सांगितले.

# मानाचा म. फुले फेटा हा माझ्यासाठी जगातील सर्वोच्च पुरस्कार : सीमा पाटील

**पुणे देहुरोड :** राष्ट्रमाता सावित्रीमाई फुले व राष्ट्रमाता रमाई आंबेडकर यांच्या लेकीला, प्रबुद्ध रंगभूमीचा 'महात्मा फुले फेटा' प्रदान होणे हा माझ्यासाठी जगातील सर्वात मोठा पुरस्कार समजते. त्यामुळे महामाता सावित्री-रमाई-जिजाऊ माँसाहेबांचा विचार पुढे घेऊन जाण्याची माझ्यावरील जबाबदारी वाढली आहे. डॉ. बाबासाहेबाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासिक धम्म भूमीवर होणाऱ्या या मानाच्या फेटा पुरस्काराने मी धन्य झाले असे भावूक उद्गार सुप्रसिद्ध शिव भीम शाहिरा सीमा पाटील यांनी काढले.



अखिल भारतीय प्रबुद्ध नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रबुद्ध साहित्यरत्न डॉ. कीर्तीपाल गायकवाड यांच्या हस्ते सीमा पाटील यांचा म. फुले फेटा, सन्मानचिन्ह, पंचशील आभूषण, गुलाब गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ऐतिहासिक धम्मभूमीचे विकास प्रणेते व प्रबुद्ध रंगभूमीचे प्रवर्तक भीमपुत्र टेक्सास गायकवाड होते. अ. भा. प्रबुद्ध नाट्य परिषद अंतर्गत प्रबुद्ध रंगभूमी पुणेच्या वतीने ऐतिहासीक धम्मभूमी देहूरोड येथेप्रबुद्ध रंगभूमीच्या 46 व्या वर्धापनदिनी समारंभात म.फुले फेटा प्रदान सोहळा झाला. प्रसिद्ध अभिनेते गायक व प्रबोधनकार जाली मोरे यांनी प्रबुद्ध सांस्कृतिक चळवळीचा गौरव केला. गायक व निवेदक दयानंद परिक्षाळे यांनी म. फुलेंचा हा फेटा म्हणजे म फुलेंचे मस्तक आहे. सुबच्चन रामसर यांनी, या विश्वाला बाबासाहेबांनी बौद्धीक चेतना देऊन ज्ञानाची संस्कृती पुढे गेली. डॉ. बाबासाहेबांना पाण्यासाठी, महाडचा सत्याग्रह करावा लागला.

बौद्धाचार्य त्रिभूवन गुरुजी यांनी प्रबुद्ध रंगभूमीच्या कार्यातूनच धम्म चळवळ गतीमान होईल असे सांगितले. सुरुवात बुद्ध रुपास सीमा पाटील, जॉली मोरे व डॉ. कीर्तीपाल गायकवाड यांच्या हस्ते झाली. जेष्ठ प्रबुद्ध विचारवंत कालकथित मा. म. देशमुख यांना आदरांजली वाहून सामुदायिक त्रिसरण पंचशील वंदना घेतली. पाहुण्यांची ओळख राहुलकुमार खांडेकर यांनी तर प्रबुद्ध रंगभूमीच्या कलाकारांची ओळख भीमपुत्र टेक्सास गायकवाड यांनी करून दिली. प्रास्तविक संजय सायरे यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत व सत्कार वसंत गायकवाड व अरुण गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. सदिच्छापर मनोगत, धर्मपाल तंत्रपाळे, संगीता वाघमारे, मिलिंद देशमुख, प्रविण वाकोडे, दिलीप राजाराम, बापूसाहेब गायकवाड, अशोक गायकवाड यांनी व्यक्त केले व मंगल कामना दिल्या. भीमशाहीर हिरापुत्र भवार यांनी स्वागत गीत गायीले प्रमुख वक्ते राहुल खांडेकर यांनी समारोप कुमार आहेर यांनी आभार प्रदर्शन केले.

जाहिरात



प्रॉपर्टी घेणे विकणे भाड्याने देणे अधिक माहिती करिता

संपर्क ९३२५६२९६३५

स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648